## सुरवातीपूर्वी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचीं अनेक मराठी इंग्रजी चरित्रें आहेत; परंतु दलित जनतेंतील वाचकासाठीं त्याना परवडणारीं व चरित्रातील ठळक घटनांचा परिचय करून देणारीं चरित्रें नाहींत म्हणूनच ह्या बाबासाहेबांच्या स्फूर्तिदायक आणि महान् चरित्राचा माझ्या आकलनाप्रमाणें केलेला गोषवारा माझ्या वाचकांना सादर करीत आहे. हें जीवन–सार सर्वांना आवडेल हीच अपेक्षा !

## द्वितीय आवृत्तीसंबंधीं

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचें हें गोड चरित्रसार वाचकानीं मोठ्या आवडीनें व भक्तिभावानें वाचलें याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. अवघ्या सहा महिन्याच्या आंत त्याची पहिली आवृत्ति संपली. त्यावरून सदरहू पुस्तकाच्या अफाट लोकप्रियतेची सहज कल्पना येते. आज बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानें समस्त दलित समाजाला मोठाच धक्का बसला आहे. त्यांच्या आयुष्याच्या उत्तर कालांतील घटना संक्षिप्त स्वरूपात ह्या आवृत्तीमध्यें समाविष्ट केल्या आहेत. तेव्हा ही सुधारून वाढविलेली आवृत्ति वाचकाना आवडेल अशी अपेक्षा आहे.

प्रथमावृत्ती एप्रिल १९५६
द्वितीयावृत्ती डिसेंबर १९५६

: प्रकाशक :
एस्. के. सापळे,
रामकृष्ण निवास,
व्हिलेज रोड,
कादिवली.

: मुद्रक :
कृ. ना. सापळे,
रामकृष्ण प्रिं. प्रेस,
मोरबाग रोड,
दादर, मुंबई १४.

[ सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन ]

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्रमांक २२२५८ दि.
क्रमांक ... २५८ नों. दि.

# प्रबुद्ध आंबेडकर

ग्रंथालय ठाणे

## रम्य तें बालपण ! १

अठ्ठावीस आक्टोबर एकोणीसशें चौपन्न हा दिवस दलिताच्या इतिहासांत चिरस्मरणीय होय ! गेल्या तीस वर्षांच्या भारतीय दलितोद्धाराच्या चळवळीचा द्योतक सुवर्णदिन पुरंदरे स्टेडियमवर साजरा झाला आणि या चळवळीचा स्वयंभू नेता—दलिताचा अनभिषिक्त राजा—अखिल अस्पृश्य जनतेनें त्यांना अर्पिलेल्या एक लाख अठरा हजारांच्या थैलीचा स्वीकार करून अभिषिक्त झाला. त्याचा हा हीरक महोत्सव दलित जनतेनें मोठ्या सश्रद्ध आणि कृतज्ञ अंतःकरणानें साजरा केला. या हीरक महोत्सवानें दलित समाज त्याचें कायमचें ऋण फेडूं शकला नाहीं, तरी त्यांच्या महान् कार्याचें यथाशक्ति पुण्यस्मरण या प्रसंगानें त्यानें केलें, नव्हे—महापूजन केलें !

भोळ्याभावड्या जनतेची त्यांनीं जी अविश्रांत सेवा केली त्याच्या सुखदुःखांची आयुष्यभर पुस्तपास्त केली आणि खस्ता खाल्ल्या, त्याची ही हृद्य फलश्रुति पाहून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांसारखे कठीण वज्रास हाणणारे धैर्यमेरू मऊ मेणाहून मृदु झाले. त्यांचा भावनावेग भरल्या डोळ्यात दिसूं लागला. आणि त्या उत्कट भावनोद्रेकातून त्यांनीं

## सुरवातीपूर्वी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचीं अनेक मराठी इंग्रजी चरित्रें आहेत; परंतु दलित जनतेतील वाचकासाठीं त्याना परवडणारीं व चरित्रांतील ठळक घटनांचा परिचय करून देणारीं चरित्रें नाहींत. म्हणूनच हा बाबासाहेबांच्या स्फूर्तिदायक आणि महान् जीवनाचा माझ्या आकलनाप्रमाणें केलेला गोषवारा माझ्या वाचकांना सादर करीत आहे. हें जीवन-सार सर्वांना आवडेल हीच अपेक्षा !

## द्वितीय आवृत्तीसंबंधीं

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचें हें गोड चरित्रसार वाचकांनी मोठ्या आवडीनें व भक्तिभावानें वाचलें याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. अवघ्या सहा महिन्याच्या आंत त्याची पहिली आवृत्ति संपली. त्यावरून सदरहू पुस्तकाच्या अफाट लोकप्रियतेची सहज कल्पना येते. आज बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानें समस्त दलित समाजाला मोठाच धक्का बसला आहे. त्यांच्या आयुष्याच्या उत्तर कालांतील घटना संक्षिप्त स्वरूपांत ह्या आवृत्तीमध्यें समाविष्ट केल्या आहेत. तेव्हां ही सुधारून वाढविलेली आवृत्ति वाचकांना आवडेल अशी अपेक्षा आहे.

प्रथमावृत्ती एप्रिल १९५६
द्वितीयावृत्ती डिसेंबर १९५६

: प्रकाशक :
एस्. के. सापळे,
रामकृष्ण निवास,
व्हिलेज रोड,
कांदिवली.

: मुद्रक :
कृ. ना. सापळे,
रामकृष्ण प्रिं. प्रेस,
मोरबाग रोड,
दादर, मुंबई १४.

[ सर्व हक्क लेखकाचे स्वाधीन ]

मराठी ग्रंथ संग्रह ठाणे
२२२५८
क्रमांक २५८

# प्रबुद्ध आंबेडकर

## रम्य तें बालपण !



अठ्ठावीस आक्टोबर एकोणीसशें चौपन्न हा दिवस दलितांच्या इतिहासांत चिरस्मरणीय होय ! गेल्या तीस वर्षांच्या भारतीय दलितोद्धाराच्या चळवळीचा द्योतक सुवर्णदिन पुरंदरे स्टेडियमवर साजरा झाला आणि या चळवळीचा स्वयंभू नेता—दलितांचा अनभिषिक्त राजा—अखिल अस्पृश्य जनतेनें त्यांना अर्पिलेल्या एक लाख अठरा हजारांच्या थैलीचा स्वीकार करून अभिषिक्त झाला. त्यांचा हा हीरक महोत्सव दलित जनतेनें मोठ्या सश्रद्ध आणि कृतज्ञ अंतःकरणानें साजरा केला. या हीरक महोत्सवानें दलित समाज त्यांचें कायमचें ऋण फेडूं शकला नाहीं, तरी त्यांच्या महान् कार्याचें यथाशक्ति पुण्यस्मरण या प्रसंगानें त्यानें केलें, नव्हे—महापूजन केलें !

भोळ्याभाबड्या जनतेची त्यांनीं जी अविश्रांत सेवा केली त्याच्या सुखदुःखांची आयुष्यभर पुस्तपास्त केली आणि खस्ता खाल्ल्या, त्याची ही हृद्य फलश्रुति पाहून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यासारखे कठीण वज्रास हाणणारे धैर्यमेरू मऊ मेणाहून मृदु झाले. त्यांचा भावनावेग भरल्या डोळ्यांत दिसूं लागला. आणि त्या उत्कट भावनोद्रेकातून त्यांनीं

आपली बालपण कथा सहस्रावधी श्रोत्यांना—त्यांच्या भाविक भक्तांना ऐकविली. त्यांचें जीवन सांगणारे बहुत आहेत व होतील. पण त्यांनीं या हीरकमहोत्सवप्रसंगीं केलेलें आत्मकथन एक महान् वक्तव्याचा नमुनाच होय ! त्यांतील भावनेचा आवेश आणि त्यांच्यासमोर चल-चित्रपटाप्रमाणें नाचणारें त्याचें संपूर्ण जीवन यांचा समन्वय होऊन त्याच्या मुखेंच जें ऐकलें तें मी या ठिकाणीं संक्षेपानें देऊं इच्छितों. बाबासाहेबांच्या विशाल जीवनाचा अंकुर दलितकल्याणासाठीं कसा वृद्धिंगत झाला त्याचें तें स्वाभाविक कथन आहे.

## आत्मनिवेदन !

" मित्र हो ! आज या ठिकाणीं मी बसलों असतांना माझ्या पूर्वा-युष्यांत ज्या कांहीं घडामोडी झाल्या त्या सर्व चित्रपटासारख्या उभ्या राहातात. मी जन्मलों कुठें, माझ्या आईवडिलांनीं कुठेंकुठें मला नेलें, माझें कायकाय झालें, हें सारें माझ्या डोळ्यापुढें उभें राहिलें आहे. परंतु मला इथें एक गोष्ट सांगावयाची आहे ती ही कीं, माझ्या वयाला ६० वर्षें पूर्ण झालीं ह्याला पुरावा तरी काय आहे ? मी कोणत्या सालीं जन्मलों याचा दाखला आहेच कुठें ? कारण माझे वडील सहाव्या पायोनियर बटालियनमध्यें होते. त्यांतून ते सातव्या पायोनियर बटालियनमध्यें गेले. धकाधकीच्या लष्करी पेशांत मी मुलगा जन्मलों खरा पण त्याची नोंद करण्याइतकें महत्त्व त्यांना वाटलें नाहीं. आणि साहजिक माझी जन्म तारीख त्यांनीं नोंद करून ठेवली नाहीं. अशी नोंद करणें किती यत्किंचित गोष्ट ! पण तीहि त्यांना साधली नाहीं. माझी आज जी जन्म तारीख मानली जाते ती खरीच आहे असें कुणीही सांगूं शकणार नाहीं.

तरीहि माझ्यासंबंधीं दोन तीन गोष्टी निश्चितपणें सांगतां येतील. राजपुतान्यांत मी महू मुक्कामीं जन्मलों. त्यामुळें कोंकणचा आणि माझा

संबंध राहिला नाहीं. वडील कोंकणांतलेच ! परंतु नोकरीमुळें त्यांना राजपुतान्यांत जावें लागलें. तेव्हां जन्म महू मुक्कामीं झाला हें मात्र अगदीं नक्कीच ! दुसरी गोष्ट म्हणजे माझा जन्म बरोबर बाराच्या ठोक्याला झाला. त्यावेळीं माझे वडील कामावर होते. आणि माझ्या आईचें बाळंत-पण चाललें होतें. माझा पिंड फार मोठा होता. माझ्या आईला त्यामुळें फार त्रास झाला असें म्हणतात. माझ्या वडिलांना चिंता वाटत होती. परंतु एकदांचे दाईनें त्याना येऊन सांगितलें, 'तुम्ही आतां घरांत जा, तुम्हांला मुलगा झाला !' आणि याचवेळीं घड्याळांत बाराचे ठोके पडून गेले होते.

तिसरी गोष्ट म्हणजे मी मूळ नक्षत्रावर जन्मलों आणि ज्योतिषानें सांगितलें कीं, हें मूल फार वाईट आहे. याची आई लवकर मरेल. या भाकितामुळें मी माझ्या भावंडांना फार अप्रिय होतों. ते मला झिडकारीत. आणि खरेंच माझी आई लवकरच वारली अशा या माझ्या जन्माविष-यींच्या तीन गोष्टी सांगतां येतील.

## लांकडें आहेत का फोडायचीं ?

माझें बालपण म्हणाल तर मोठें मजेदार होतें. माझें मलाच त्यासंबंधीं मोठें आश्चर्य वाटतें. मी बारातेरा वर्षांचा होईतोंवर सर्व लोक असें निश्चयपूर्वक सांगत कीं, हें पोर घराण्याला काळिमा लावणार. आणि त्यांना तसें वाटलें तर नवल नव्हतें. मी बारा तेरा वर्षांचा होईतोंवर लंगोटीशिवाय दुसरें वस्त्रच नेसलों नाहीं. कुटाळासारखा दारोदार जाऊन गांवांतल्या बायकांना विचारी कीं, 'तुमचीं लाकडं फोडायचीं आहेत काय ?' शिक्षणात तर मला प्रथम प्रथम कांहींच राम वाटत नव्हता. आई वारल्यानंतर माझें संगोपन माझ्या आत्यांनीं केलें. मला वाटे मी शिकून काय दिवे लावणार ? म्हणून सहा महिने मी

माळ्याचें काम केलें. मिलिटरी कँपांत बागबागायती असायची. तेथील माळ्याच्या पोराशीं सगत केली. माती, दगड उचलले. जागा साफ केली. नळानें पाणी बागेला द्यावें लागे. पण तें मला नीट साधत नव्हतें. माळी-कामच नव्हे तर घरावरचीं सर्व कौलें काढलीं आणि त्याच्या नाल्या केल्या-असें तें माझें बालपण !

साताऱ्याला जेव्हां मी राहायला आलों तेव्हां इतर सुभेदार व नातेवाईकही तेथें शेजारीं राहात. घरासमोर उकिरडा होता. शेंडका होता. आणि त्या उकिरड्यावर एक उंबराचें झाडही होतें. मी झाडावर चढण्यांत फार पटाईत. वानर देखील इतक्या कुशलतेनें चढणार नाहीं. आतां जरी पायानें मी अशक्त आहे तरीं त्यावेळीं हे पाय फार चपळ होते. झाडावर चढून त्याच्या फांद्यांवर खुशाल कांबळ टाकून मी झोंपत असे. व लहर आली कीं उकिरड्यावरील राखेंत उडी घेत असे. त्यावेळीं साताऱ्याला प्लेग आला होता. लोक म्हणत, ‘ एवढे लोक प्लेगानें मरतात पण या पोरालाच प्लेग कां होत नाहीं. ’ असा मी त्यांच्या दृष्टीनें नाठाळ होतों. एकदां आम्हाला बकऱ्या हव्या होत्या. कसाई आपल्या बकऱ्या तीन रुपयाप्रमाणें विकायला तयार नव्हता. तेव्हां आम्ही उगराणी केली आणि दोन बकऱ्या घेऊन आलों. कसाई मागाहून संतापून गेला. आम्ही लांब बांबू घेऊन बकऱ्यांना चारा घालीत असूं. कुणी म्हणे या बकऱ्या चागल्या नाहींत. बिन-शिंगांच्या चागल्या. थोडक्यांत अशा हूडपणांत माझें बाल आयुष्य गेलें.

घरांत मात्र मला बऱ्याच लोकांनीं लडिवाळपणें वागविलें. आत्यांचा तर मी फारच लाडका. तिनें सर्वांना सक्त ताकीद देऊन ठेवली होती. आईविना पोरगें आहे. त्याला धुसफूस करूं नका. त्यामुळेंच मला घरांत स्वातंत्र्य मिळालें. पण मी त्याचा दुरुपयोग केला. सगळ्यांनाच वाटे या पोराच्या हातून कांहीं होणार नाहीं. ज्यांनीं ज्यांनीं माझें पालन केलें त्यांतील कोणी जगली नाहींत. ते आज माझें कौतुक पहायला हजर

असते तर मला फार आनंद झाला असता. पण माझ्या या बालपणाकडे आणि आजच्या माझ्या स्थितींत केवढा फरक आहे, हें तुमच्या लक्षात येतच आहे. माझ्या आयुष्यांत केवढी ही क्रांती झाली. मी गुराखी झालों असतों, किंवा काबाडकष्ट करणारा राहिलों असतों तर हा क्षण उगवला नसता.

माझे वडील मला नेहमींच म्हणत, '**सावलींतलं काम शीक !**' या साऱ्या आठवणी एकत्र करून एक चरित्र लिहावें असा माझा मानस आहे. पण पुरें चरित्र नाहीं तर एक लहानसें 'माझें बालपण' म्हणून आत्मचरित्रपर पुस्तक लिहिणार आहें. असो !

मी या पदाला पोचलों तें केवळ माझ्यामध्यें कांहीं उपजत गुण होते म्हणून नव्हे ! माझें आयुष्य जसें चाललें आहे तसें चालूं दिलें असतें तर मी एक निपितर माणूस झालों असतों. पण मला माझी पूर्ण जाणीव होती. या जाणीवेनें माझ्या आयुष्याला एक प्रकारचें वळण लावलें व हें वळणच खरें महत्वाचें आहे. तें कां मिळालें व कसें मिळालें हें मी तुम्हाला सकारण सांगणार आहें.

## . ते तीन गुरु

माझे तीन गुरु आहेत. प्रत्येकाला गुरु असतात तसे मलाहि आहेत. मी कांहीं संन्यासी नाहीं कीं बैरागी नाहीं. पण मलाहि गुरु आहेत. माझे पहिले व श्रेष्ठ गुरु **भगवान बुद्ध** होत ! मी दहा वर्षांचा असतांना माझे वडील कबीरपंथी साधू होते, हें मला आठवतं. माझ्या वडिलांचें घर एक धर्मासनच म्हणतां आलें असतें. तसेंच तें विद्यासनहि होतें. माझे वडील विद्येचे भक्त आणि भोक्ते होते. तसेच धर्माचेही चाहते होते. माझ्या लहानपणीं रामायण, महाभारत इत्यादि ग्रंथांचें त्यानीं माझ्याकडून नीट पारायण करून घेतलें होतें.

माझे तिसरे गुरु म्हणजे **ज्योतिबा फुले** ! ब्राह्मणेतरांचे खरे गुरु ज्योतिबाच होत. शिंपी, कोष्टी, न्हावी, कोळी, महार, माग, चांभारांना माणुसकीचे धडे फुल्यांनींच दिले. अखिल ब्राह्मणेतर ज्योतिबांच्या मार्गानेंच राजकारण करीत होते. पुढें मराठे आमच्यांतून फुटले. कुणी कॉंग्रेसमध्यें उष्टें खाण्यासाठीं गेले, हिंदुमहासभेंत गेले, कोणी कुठेंही जावोत; पण आम्हीं मात्र ज्योतिबाच्याच मार्गानें जाऊं. जोडीला कार्ल मार्क्स घेऊं किंवा दुसरे कांहीं घेऊं; पण ज्योतिबाचा मार्ग कांहीं आम्हीं सोडणार नाहीं.

हे असे माझे तीन गुरु आहेत व त्यांच्या शिकवणीनेंच माझें आयुष्य बनलें आहे.

## तीन उपास्यदैवतें

याशिवाय माझी तीन उपास्य दैवतेंही आहेत. कोणाची मरीआई, जोगाई, अंबाई, खंडोबा अशीं आहेत. माझें **पहिलें दैवत विद्या होय.** विद्येशिवाय मानवाला शांतता नाहीं आणि माणुसकी नाहीं. विद्या ही सर्वांना अवगत झाली पाहिजे. ती महासागरासारखी आहे. बुद्धानें एकदा म्हटलें आहे कीं, ' बुद्धधर्म हा शुद्ध धर्म आहे. येथें भेदभाव नाहीं. श्रमण, भिक्कू, ब्राह्मण, भंगी मग तो कोणीही असो ! सारे एक आहेत. नद्या, नाले मग त्याचे नांव कोणतेंही असो ! ती यमुना असो, गंगा, ब्रह्मपुत्रा, गोदावरी कुठलीही नदी असो वा कुठल्याही प्रांतांतून वाहत आलेली असो, एकदां का त्या समुद्रास मिळाल्या कीं त्या अफाट सागराच्या पाण्यांत एकरूप होऊन जातात आणि मग कोणालाही हें गंगेचें पाणी आणि हें यमुनेचें पाणी असा कांहींही फरक करणें शक्य नसतें. तद्वत्च माझ्या या संघात सर्वांना एकरूप करून टाकलें आहे. माझा संघ हा महासागरासारखा आहे. जातपात कांहीं नाहीं. सर्व तुम्हीं माणसें आहांत. एक आहांत. ज्यांना विद्येची खरीखुरी

रामायण–महाभारत वाचून माझ्या मनावर मोठा परिणाम झाला होता. माझे वडील म्हणत, 'आपण गरीब असलों तरी भिण्याचें कारण नाहीं. तूं विद्वान् कां होऊं शकणार नाहींस?' एकदां मी कोणती तरी परीक्षा पास झालों होतों. त्यावेळीं चाळींतल्या लोकांनीं माझ्या वडिलाची इच्छा नसतांहि दादा केळुसकरांच्या मदतीनें माझा सत्कार करावयाचें ठरविलें. माझे वडील म्हणायचे, 'नको तो सत्कार! मुलाचा असा सत्कार केला म्हणजे त्याना पुढारी झालों असें वाटतें.' शेवटीं सत्कार झालाच आणि दादा केळुसकरांनीं मला एक बुद्धाच्या चरित्राचें पुस्तक बक्षिस दिलें. हें पुस्तक वाचल्यानंतर माझ्यात काहीं निराळाच प्रकाश शिरला. मारुती, सीता, राम, त्यांचा वनवास, धोब्याच्या सांगण्यावरून रामाचा पत्नीत्याग, कृष्णाच्या सोळासहस्र बायका ह्या गोष्टी कांहींतरीच भयंकर वाटल्या. या गोष्टी माझ्या मनाची पकडच धरीनात. परंतु बुद्धधर्माच्या त्या अभ्यासानें मला त्या धर्माचा जास्त अभ्यास करावासा वाटला. आजही त्या धर्माची पकड माझ्या मनावर कायमची आहे. व माझी अशी ठाम खात्री झाली आहे कीं, जगाचें कल्याण फक्त बौद्धधर्मच करूं शकेल. हिंदु लोकांना आपलें राष्ट्र जगवायचें असेल तर त्यानीं बौद्धधर्मच स्वीकारला पाहिजे, असे माझें त्याना सांगणें आहे.

माझे दुसरे गुरु कबीर! माझे वडील कबीर पंथी होते. त्यामुळें कबीराच्या जीवनाचा आणि त्याच्या तत्वज्ञानाचाही माझ्यावर मोठा परिणाम झाला आहे. माझ्या मताप्रमाणें कबीराला गौतम बुद्धाच्या तत्वज्ञानाचें खरें रहस्य उमगलें होतें. आजवर मी कोणालाच श्रेष्ठत्वाचा मान दिला नाहीं. गांधींना मी कधींच महात्मा म्हटलें नाहीं. कारण कबीरानें म्हटलें आहे, 'जो मानस होना कठीण है! तो साधू क्या बने!' (जो माणूस होणें मुष्किलीचें असतें, तो महात्मा कसा होईल?)

आवड आहे, त्यांनीं ती सफल करावी. ज्याप्रमाणें माणसाला जगण्यासाठीं अन्नाची आवश्यकता असते त्याप्रमाणें त्याला विद्येचीही आवश्यकता आहे. ज्ञानाशिवाय तो काय करूं शकेल ? आज हिंदुस्थानांत शें. ९० लोक निरक्षर आहेत. त्याचें कारण ब्राह्मणानीं आम्हाला विद्या दिली नाहीं. त्यांच्या धर्माचे कायदे आमच्या आड आले. त्यानीं आमचा विद्यार्जनाचा हक्क हिरावून घेतला. आमच्या लोकांना दगड हीच विद्या वाटे. त्यामुळेंच आमच्या धार्मिक समजुती कुचकामी ठरल्या व आम्हांला रसातळाला घेऊन गेल्या. दगडाची पूजा करणोर भाविक आजही आमच्यांत आहेत. तुकोबानें एके ठिकाणीं म्हटलें आहे:—

नवसे जरी का पुत्र कन्या होती ।
मग स्रीया कां पतीपाशीं राहतां ॥

याचें कारण त्यांना विद्या दिली नाहीं. त्याबाबतींत तीं अगदीं अडाणी राहिलीं आहेत. अत्यंत मौल्यवान् वस्तू आहे ही विद्या ! माझें विद्येचें वेड मोठें भयंकर आहे. कोणा ब्राह्मणाच्या घरीं नाहींत इतकीं पुस्तकें आता दिल्लीला मजजवळ आहेत. आहेत कोणा ब्राह्मणाजवळ ! दाखवून द्यावींत त्यांनीं ! ठक्कर आणि कंपनीचीं माझ्यावर आठ हजाराची उधारीचीं बिलें थकलेलीं आहेत. मला उधारीनें माल कुठेंहि मिळतो. जिथं माझी उधारी थकली आहे तिथेंच मी दारात मोटार उभी करतों. इतकें माझें विद्येविषयीचें वेड आहे. हें वेड सर्वांना पाहिजे. एखाद्याची रांड असते ना दुसऱ्या गावात कुठेंतरी ठेवलेली, पण रात्रीं बारा वाजतां जेव्हां त्याला आठवण येते तेव्हा तो तडक उठून तिकडे जायला लागतो. मग वाटेंत स्मशान असो, भूत असो कीं वाघ असो तो कांहींहि पहात नाहीं. तो तिच्या घरीं जाणारच. एवढें जेव्हां पुस्तकावर प्रेम माणूस करील तेव्हांच तो विद्येचा खरा पुजारी ठरेल. मी तर चोवीस तास विद्येची पूजा करीत असतों.

## कण्याचा भात व भाकर खाली !

माझें दुसरें दैवत विनय होय ! मी कोणाची याचना केली नाहीं. माझें ध्येय असें कीं, माझें पोट तर भरलें पाहिजे आणि माझ्या लोकाची सेवा करता आली पाहिजे. डॉ. परांजपे यांच्या विनंतीमुळें एका महाविद्यालयात मी अर्थशास्त्राचा प्रोफेसर झालों. तेव्हां त्यांनीं मला तेरा व्याख्यानें देण्याचें सांगितलें. पण मी म्हणालों फक्त चार व्याख्यानें देईन. पटलें तर ठेवा नाहींतर माझा मार्ग मोकळा आहे. कारण मला माझ्या लोकाची सेवा करावयाला वेळ पाहिजे. पोयबावडी नाक्यावरच्या ४८ व ५० नंबरच्या खोलींत मी कण्याचा भात आणि कण्याची भाकरी खाल्ली. पण समाजसेवेला सोडून भारी पगाराच्या नोकरीकडे वळलों नाहीं. त्यांतूनही मला मार्ग सांपडला. कोणीकोणी जनतेनें दिलेल्या थैल्या स्वीकारून घरें बांधलीं. मा या माहितीच्या एका पुढाऱ्यानें म्हणे ४७ हजाराच्या प्रॉमिसरी नोटा लिहून दिल्या होत्या. आणि लोकानीं जेव्हा एक लाख रुपयांची थैली त्याला अर्पण केली तेव्हा तें कर्ज त्यानें फेडलें. मला तसें करावयाचें नाहीं. मी माझें स्वतःचें पोट स्वतःच भरून जी काहीं सेवा करतां येईल ती केली. नोकरी मला करावयाचीच नव्हती. कोणीही गव्हर्नर जनरल येवो. त्याच्याशीं माझी मैत्री होती. परंतु मी कोणाजवळही मला हें बनवा किंवा मला ही जागा द्या—हो, दुसऱ्यासाठीं मी काहीं केलें असेन—पण स्वतःसाठीं एक बोटभर चिठ्ठी लिहिल्याचें कोणीही दाखवून द्यावें. एक्झिक्युटिव्ह कौन्सिलर व्हावें ही माझी दांडगी इच्छा होती. ती पुरी झाली. आतां मला ना पेन्शन, ना पगार, ना प्रॉव्हिडंट फंड, काहीं नाहीं. एकदां इंग्रजाच्या राज्यांत व एकदां कॉंग्रेसच्या राज्यांत कौन्सिलर म्हणून जागा पत्करली. पण तेथेंही माझा कॉंग्रेसशीं खटका उडाला. मला जज्ज होतां आलें असतें पण अडकून घेऊन करणार काय ? तेव्हा माझें सांगणें हेंच कीं कुणासाठीं किंवा

कशासाठींही लीन असूं नये. मात्र विनय असावा. मी कांहीं तरी आहे, असें मानलें पाहिजे. मी परमेश्वरालाही कमी लेखतों. इतका माझा स्वाभिमान तळपता आहे. आणि माझें तिसरें दैवत म्हणजे शील होय. माझ्या आयुष्यांत मी दगाबाजी, फसवणूक किंवा आत्मसिद्धीसाठीं पाप केलें नाहीं, त्याबद्दल मला मोठा अभिमान वाटतो. मी विलायतेला अनेक वेळ गेलों. पण अजून दारू प्यालों नाहीं, विडी–सिगारेट ओढली नाहीं. मला कसलें व्यसन नाहीं. फक्त पुस्तक व कपडा काय तो मला अधिक प्रिय आहे. शीलसंवर्धन हा गुण माझ्यांत मोठा आहे, हें मला सांगावयास अभिमान वाटतो. अशा प्रकारें माझे तीन गुरु आणि तीन उपास्य दैवतें आहेत. त्यांचा मी बनलों आहे. या पदाला मी पोंहोंचलों तो या शक्तीमुळें होय! मी केवळ कारणमात्र आहें. त्या त्रयी शक्तींचा मी एक पुतळा आहें. तेव्हां या उपास्यत्रयीचें अनुकरण करा.

तुम्ही माझा हीरकमहोत्सव म्हणून जो समारंभ केलात तो 'मी' या व्यक्तीकरितां नसून या तीन दैवताचा आदर्श म्हणून त्या उपास्य दैवताना कृतकृत्य करण्यासाठीं म्हणून केलात, असेंच मी मानतों.

१९१९ सालापासून म्हणजे गांधींनीं राजकारणांत पाऊल टाकल्यापासूनच मीही राजकारणांत उडी टाकली आहे. पण त्यांचें माझें असें कधींच जुळलें नाहीं. अनेक प्रकारचे खटाटोप आम्ही केले. महाडचा पाण्याचा सत्याग्रह, नाशिकचा मंदिरप्रवेशाचा सत्याग्रह, नानाप्रकारचे सत्याग्रह केले. परंतु कोणी सहानुभूति दाखविली नाहीं. वर्तमानपत्रांतून आमचीं व्यंगचित्रें येत. बातमीदार येत नसत. बातमी छापत नसत. तरी बरें आतां येतात ते! पूर्वी हाका मारल्या तरी येत नसत. मी बहिष्कृत भारताचा संपादक होतों. १९१९ पासून १९४२ पर्यंत मी संपादक होतों. एकदां केसरीला जाहिरात पाठविली. त्याबरोबर तीन रुपयाची

मनीऑर्डरही केली. पण ती परत आली. कारण जागा नाहीं म्हणून. टाइम्स ऑफ इंडियाला टेलिफोन केला. त्यांना वाटलें कुठली ही भिकारडीं त्रास द्यायला आली ! त्याचेही उत्तर नाहीं. आणि आता सारखे पाठीमागें लागतात. रिपोर्ट द्या म्हणून ! अशी ही परिस्थिति !

## मी महारांचा ऋणी

मी खरोखरीच कुणाचा ऋणी असेन तर मी ज्या जमातींत जन्मलों त्या महार लोकांचा ! महार लोकांच्या बळावरच मीं हें करूं शकलों. हा माझा तीस वर्षांचा अनुभव आहे. महार रणशूर आहे. ते वाघासारखे लढूं शकतात. त्यागही करूं शकतात. इतर कोणतीही जात ह्या गोष्टी करूं शकत नाही. तेव्हा माझ्या दृष्टीनें त्यांचे माझ्यावर अनंत उपकार झाले आहेत. मी येथें जातिवाचक उद्गार काढतों, याबद्दल कोणी मला दोषारोपण करील. पण मी या जातींत जन्मलों याबद्दल मला मोठा अभिमान वाटतो. या थराला समाज आला त्याचें सारें श्रेय तुम्हा पुरुषानाच नाहीं. पण त्यात बायकांचाही मोठा भाग आहे. तीस वर्षां-पूर्वीच्या स्त्रिया फार वेडगळ आणि गलिच्छ राहात. त्यावेळीं आपल्या स्त्रिया ' आम्हांला नाहीं बामनं व्हायचं.' असें म्हणत. आजची स्थिती तशी नाहीं. परंतु अजून आपण शिखराप्रत पोचलों नाहीं. मध्यावर आलों आहोंत, कडा चढत आहोंत. कधीं पाय घसरेल सांगतां येत नाहीं. अजूनही आपली संकटमय स्थिती आहे हें सदैव मनाशीं बाळगलें पाहिजे. मी पुढारी, का तो पुढारी हें भांडण आतां मिटविलें पाहिजे. सार्वजनिक कार्याला मदत करा. हजारों प्रकारच्या संस्था दानधर्म करून जातींचा उद्धार करतात. कोंकणस्थ ब्राह्मण, देशस्थ, सारस्वत, प्रभु इ० ब्राह्मणाच्या संस्था आहेत. त्यांनीं आपल्या जातींच्या विद्यार्थ्यांना विलायतेला पाठविलें आहे. मोठ्या हुद्याच्या जागा दिल्या आहेत. या गोष्टींचा आदर्श लक्षात ठेवून वर्षाकाठीं निदान एक रुपया दिलात तरी

कितीतरी कार्य होईल. बाबासाहेब आहेत म्हणून सर्व काहीं करावयाचें असें म्हणून कसें चालेल? मी आता राजकारणापासून अलिप्त होणार आहें! तुमचें जीवन आता तुम्हींच उज्ज्वल केलें पाहिजे. त्याग, चिकाटी निस्वार्थीपणा व संघटनाबल वाढवून कार्य करा. तुम्ही काय करता हें मला माझ्या हयातींत पहावयाचें आहे."

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीं आपल्या वरील आत्मकथनांत आपण आयुष्याचें चित्र किती जलद आणि हळुवारपणें रेखाटलें आहे हें वाचकांच्या लक्षात आलेंच असेल. डॉ. बाबासाहेबांसारख्याचें जीवन आम्हांला मार्गदर्शक झालें एवढेंच नव्हे तर पददलितांच्या प्रगतीआड आलेली प्रचंड शीला त्यांनीं आयुष्यभर कष्टून दूर केली आहे. उपेक्षितांना समाजात वर मान करूं दिली. त्यांच्या स्वातंत्र्याची मुहूर्तमेढ रोवली आणि पुढील प्रगतीचा रस्ता कायमचा खुला करून दिला.

डॉ. बाबासाहेबांनी घडवून आणलेली समाजक्रांति त्यांनीं केलेल्या आत्मकथनाच्या आधारानें अधिक विशद करून सांगण्याचा प्रयत्न मी पुढील प्रकरणातून केला आहे व तेंच त्यांच्या चरित्राचें सार ठरेल अशी अपेक्षा आहे.

डॉ. बाबासाहेबांनीं आपलें बालपण हूडपणांत आणि जिद्द करण्यांत गेल्याचें स्वतःच कबूल केलें आहे. त्याचें मराठी प्राथमिक शिक्षण आंबेडकर नांवाच्या शिक्षकाच्या हाताखालीं झालें. या शिक्षकाचा त्यांच्यावर फार लोभ होता. बाबासाहेबांचें **आंबवडेकर** हें मूळ नाव बदलून आपल्याप्रमाणेंच **आंबेडकर** असें सुटसुटीत करून घेतलें होतें. या शिक्षकांनीं त्यांना मोठ्या ममतेनें व आपुलकीनें वागविलें. याच्या उलट इंग्रजी पाचव्या यत्तेंत असतांना एक ब्राह्मण शिक्षक त्याना द्वेषानें टोंचून बोलत, ' ते म्हणत, तूं जातीनें महार आहेस. तुला हें शिक्षण घेऊन काय करावयाचें ?' बाबासाहेबानीं त्यांचा हा साळसूदपणाचा सवाल पाचसहा वेळां ऐकून घेतला, पण एक दिवस त्यांनीं त्याना चांगलाच दम भरला. ते त्यांना म्हणाले, ' गुरुजी, हे शब्द जर तुम्ही पुनः उच्चाराल तर याद राखून ठेवा. मी शिक्षण घेऊन काय करणार याच्याशीं तुम्हाला कांहीं कर्तव्य नाहीं.' बाबासाहेबांच्या स्वभावातील अभिजात निर्भयपणा या उदाहरणावरून कुणाच्याही लक्षांत येईल.

त्यानंतर त्यांची विल्सन हायस्कूलचे एक शिक्षक **कृष्णाजी अर्जुन केळूसकर** यांच्याशीं ओळख झाली. केळूसकर गुरुजींनीं त्यांच्या विद्यार्जनांत पुष्कळ सहाय्य केलें हें सर्वश्रुत आहे. त्यांच्याच सहाय्यानें बाबासाहेबांना बडोद्याच्या नरेशांकडून परदेशी शिक्षणासाठीं शिष्यवृत्ति मिळाली.

बाबासाहेबांचें हायस्कूल—कॉलेजचें शिक्षण चालू असतांना त्यांच्या वडिलांची—सुभेदारांची त्यांच्यावर करडी नजर असे. वडिलांच्या शिस्ती-मुळेंच बी. ए. पर्यंतचें शिक्षण अत्यंत बिकट परिस्थितींतही पार पडलें.

सर्व साधारणपणें शिक्षकवर्ग श्रीमंतांच्या मुलांकडे अधिक लक्ष देत. पण बाबासाहेबांकडे यःकश्चित् महाराच्या पोराकडे कोण पाहाणार ?

## अरेरे, केवळ महार म्हणून !

विद्यापीठासारख्या पवित्र ठिकाणींही बाबासाहेबांना त्यांचें अस्पृश्यत्व जाचक झालें होतें. आपल्या अभ्यासक्रमात संस्कृत विषय घ्यावा असें त्याना वाटत असूनही केवळ ' महार ' म्हणून त्याना तो शिकविण्यास ब्राह्मण शिक्षक तयार झाले नाहींत; त्यामुळें त्याना पर्शियन भाषेचा अभ्यास करावा लागला. साहजिकच हिंदुधर्मांतील मोठ्या ग्रंथांचें परिशीलन त्यांना इंग्रजी भाषेच्या माध्यमानें करावें लागलें. खरोखरच बाबासाहेबा-सारख्याना संस्कृत भाषेचें ज्ञानभांडार खुलें झालें असतें तर त्यांच्या जीवनाचा मार्ग बदलला असता. संस्कृत भाषापंडितांचे ते शिरोमणी बनले असते. पण योगच असा होता कीं ते समाजक्रांतिकारक व्हावयाचे होते. जें कार्य केवळ मानवतावादी सुधारकाना आणि संताना करता आलें नाहीं, तें कार्य करणारा कुणीतरी क्रांतिकारक पाहिजे होता, बाबासाहेबांना समाजक्रांतीला प्रवण करणारी वागणूक यावेळीं मिळाली हें एक प्रकारें फायद्याचेंच ठरलें.

हा काल म्हणजे अस्पृश्य समाजाची किंबहुना भारतीय गुलामगिरीची काळीकुट्ट भयाण रात्र होती. माणसाच्या सावलीनें माणूस अपवित्र होणें, धर्मानें मानवावर सामाजिक बहिष्कार टाकणें किंवा व्यक्तीचा ज्ञानमार्ग बंद करून ठेवणें, हें अमेरिकेंतील किंवा मध्ययुगीन युरोपातील गुलामगिरीं-पेक्षा भयंकर अमानुष होतें. आणि अशा काळांत बाबासाहेब आपली बी. ए. ची परीक्षा देऊन ते १९१३ च्या जानेवारींत उत्तीर्ण झाले, ही किती कौतुकाची गोष्ट !

बडोद्याच्या सयाजीराव महाराजांनीं दिलेल्या शिष्यवृत्तीच्या आधारावर समाजशास्त्र, अर्थशास्त्र आणि विशेषतः पब्लिक फायनन्स याचा

अभ्यास करण्याकरतां ते २० जुलै १९१३ ला न्यूयार्कला जाऊन पोचले. आणि कोलंबिया विद्यापीठांत त्यांनीं आपल्या अभ्यासास सुरवात केली.

गर्भश्रीमंताचीं मुलें परदेशीं शिक्षणासाठीं जातात. त्यांच्याकडे असलेला पैसा खर्च करण्याचा तो एक हव्यास असतो. वस्तुत' ज्या आत्म–प्रचितीनें आणि तळमळीनें बाबासाहेब आपला अभ्यास करीत होते ती स्वत:संबंधीची जाणीव त्याच्यामध्यें थोडीच असणार ! सामाजिक अवहेलनेच्या झळा सहन करून त्यांनीं हा मार्ग आक्रमिला व याच मार्गानें त्याना आपल्या समाजाचा उद्धार करावयाचा होता. पण त्यांच्या सोबतीच्या इतर विद्यार्थ्यांना हें त्याचें अभ्यासांत गर्क राहणें चेष्टेचा विषय झाला होता. भल्या सकाळीं बाबासाहेबांची स्वारी अभ्यासांत असली तर ते त्यांना चिडवूं लागायचे. म्हणायचे, 'कायरे युनिव्हर्सिटीवर झेंडा लावणार आहेस ?' कोणी म्हणे, 'आहे बुवा ! महाराजांचे डोळे दिपवून खूप पैसा उपटणार एकूण !' परंतु बाबासाहेब एखाद्या असंगाप्रमाणें आपल्या अभ्यासात दंग राहात. कधीं कधीं खिडक्या दरवाजे बंद करून व कानांत बोळे घालून अभ्यास करीत एवढी त्यांची निष्ठा होती !

## गूढ आत्मशक्तींचा विकास

या विद्यापीठांतील एम्. ए. ची परीक्षा उत्तीर्ण होऊन त्यानीं पीएच् डी. च्या अभ्यासास सुरवात केली. प्राध्यापक सेलिग्मन यांच्यासारख्या तळमळीच्या शिक्षकाचें त्यांना मार्गदर्शन लाभलें. प्रो. सेलिग्मन याच्या मार्गदर्शनामुळें त्याचा बौद्धिक विकास झाला. त्याबाबत ते बोलतात कीं, 'बी. ए. होईपर्यंत मी साधारण प्रतीचाच विद्यार्थी होतों. माझ्या हातून कांहीं महान् कार्य किंवा संशोधन होईल याबद्दल मला कांहींच अपेक्षा न्हती. याचा अर्थ माझी बुद्धि मंद होती किंवा अभ्यासाची

मला गोडी नव्हती असें नव्हे. पण संशोधन करण्यासाठीं जो एक विशिष्ट प्रकारचा दृष्टिकोन हवा किंवा लायक आणि अनुभवी शिक्षकाचें मार्गदर्शन हवें ते या काळांत मिळालें नसल्यानें माझ्यातील मूढ शक्तींना चालना मिळालेली नव्हती. अंगीं उपजत गुण असले तरी मूढशक्तींचा विकास व्हावा लागतोच. अमेरिकेस जाईपर्यंत माझे अनेक गुण सुप्तावस्थेंत होते. त्याचा विकास होण्याचें कार्य प्रोफेसर सेलिग्मन व इतर विद्वानाकडून झालें, हें मला कबूल करायला हवें. या विद्वान् प्रोफेसराच्या संगतींत आल्यावर मला आढळून आलें कीं, मला स्वतंत्रपणें विचार करता येतो. मी संशोधन कसें करावें, याविषयीं एकदा प्रो. सेलिग्मन यांना विचारलें असता ते मला म्हणाले, 'तूं आपलें काम चालू ठेव. म्हणजे तुला आपोआपच संशोधन कसें करावें तें समजूं लागेल.'

'पुस्तकें लिहिताना वेळ कसा निघून जातो व दिवसामागून दिवस कसे निघून जातात हें मला कळून येत नाहीं. माझें लिखाण चालू असताना माझ्या साऱ्या शक्ति एकवटलेल्या असतात. मी जेवणाची पर्वा करीत नाहीं. मी कधीं कधीं रात्रभर वाचीत लिहीत बसतों. मला त्यावेळीं कधीं कंटाळा येत नाहीं किंवा थकवा येत नाहीं.'

बाबासाहेबाचा ज्ञानयज्ञ असा चालला होता !

कोलंबिया विद्यापीठांत अविश्रांत श्रम करून त्यांनीं आपला प्रबंध लिहिला. त्याचें नांव The National Dividend of India-Historical and Analytical study ! या प्रबंधावर त्याना डॉक्टोरेट Ph. D. ही पदवी मिळाली; पण हा ग्रंथ पैशाभावीं त्यांना प्रसिद्ध करतां आला नाहीं व ही पदवी विद्यापीठाच्या नियमाप्रमाणें जाहीर झाली नाही. पुढें तोच प्रबंध त्यानीं इंग्लंडहून प्रसिद्ध करून घेतला. पण १

पुस्तकाचें नांव Evolution of Provincial Finance in British India ( ब्रिटिश भारतांतील चलन विकास ) असें ठेवलें.

या विद्यापीठांत त्यानीं बहुविध विषयांचें अध्ययन केलें. जणुं अस्पृश्य समाजाची हजारों वर्षांची ज्ञानार्जनाची भूक घेऊन ते गेले होते ! आणि त्या त्या ज्ञानसागरांत मनसोक्त डुंबत राहिले.

आपल्या मनांत सतत काहूर आणि खळबळ माजवून राहिलेला जातिभेदाचा प्रश्न त्यांनी '**हिंदुस्थानांतील जाती,त्यांची घटना,उत्पत्ति आणि वाढ**' हा प्रबंधांत मांडला. कोलंबियाचे समाजशास्त्राचे प्रोफेसर डॉ. ए. गोल्डनवीजर व सर्व विद्यार्थी या प्रबंधावर बेहद्द खूष झाले. या प्रबंधाची भाषा इंग्रजी पंडितालाही लाजविणारी होती.

## पुनः आर्थिक अडचण !

कोलंबिया विद्यापीठाच्या एम्. ए. आणि पीएच्. डी. या पदव्या घेतल्यावर वकिलीचा आणि अर्थशास्त्राचा अभ्यास लंडन विद्यापीठांत करावा असें त्यांच्या मनांत आलें. बडोदें सरकारकडून मिळणारी त्यांची शिष्यवृत्ति आणखी एक वर्षापुरतीच होती.आणि या अभ्यासाला किमान दोन वर्षें तरी हवी होतीं. आपला हा मानस त्यांनी बडोदें सरकारला कळविला. आपल्या म्हणण्याला प्रो. सेलिग्मनचीही शिफारस जोडली. परंतु त्यावेळच्या बडोदे सरकारच्या नोकरशाहीला बाबासाहेबाचा हा महाराजाच्या कृपेनें होणारा अभ्युदय पाहवेना. संस्थानच्या नोकरीवर रुजू व्हावें असें कळवून बाबासाहेबाची पराकाष्ठेची निराशा केली. शेवटीं महाराजाप्रत पत्रव्यवहार जाऊन त्यानीं एकवर्ष शिष्यवृत्ति चालविण्याचें आश्वासन दिलें व पुढील वर्षासंबंधी निर्णय अनिश्चित ठेवला. बाबासाहेबानीं आतां स्वतःच्या पायावर उभें राहून अभ्यास पुरा करण्याची प्रतिज्ञा केली आणि लंडन विद्यापीठांत प्रवेश केला.

प्रो. सेलिग्मनकडून जीं परिचयपत्रें मिळालीं, त्यांच्या मदतीनें बाबासाहेबांनीं लंडनमध्येंही आपल्याबाबतचें प्राध्यापकवर्गाचें चांगलें मत बनवून घेतलें. येथें त्याना मि. सिडने वेब याची फारच मदत झाली. इंडिया ऑफिस लायब्ररींत वाचनाला बसण्याची परवानगी त्यांनींच मिळवून दिली. यावेळीं ते सरळ एम्. एस. सी. च्या अभ्यासास लागले. विद्यापीठानेंच त्यांना तशी खास परवानगी दिली. या पदवीसाठीं Provincial Decentralization of Indian Finance (हिंदी चलनाचें प्रांतीय विकेंद्रिकरण) हा प्रबंध लिहावयाचें ठरविलें. त्यासाठीं लंडन स्कूल, ब्रिटिश म्युझियम, इंडिया ऑफिस इत्यादि सर्व ग्रंथसंग्रहालयातील अर्थशास्त्रावरील ग्रंथ त्यांनीं चाळले. त्यांची अध्ययनांतील सहनशीलता पराकोटीची असल्यामुळें एवढा प्रचंड खटाटोप करून अमोल संशोधन केलें व हा प्रबंध तयार केला.

या प्रबंधाचें अध्ययन चालू असतांनाच त्यांची शिष्यवृत्तीची मुदत संपुष्टांत आली व एक नवीन अडचण त्यांच्यापुढें उभी राहिली. त्यांच्या बॅरिस्टरीच्या अभ्यासाचीहि तीच गत झाली व हे दोन्ही अभ्यासक्रम सोडून आपल्याला परत जावें लागणार म्हणून ते निराश झाले. पण त्यांतूनही मार्ग काढण्याचा विचार करूं लागले.

परंतु काहींशा प्रमाणांत त्याची भ्रांती कमी झाली. प्रो. कॅनन त्यांचे अर्थशास्त्राचे शिक्षक होते. त्यांनीं विद्यापीठाकडून खास सवलत म्हणून त्याचा अपुरा प्रबंध अवकाशानें पूर्ण करण्याची परवानगी मिळवून दिली.

बडोदे सरकारशीं केलेल्या कराराप्रमाणें ते बडोदें संस्थानची नोकरी करण्यासाठीं पुनः भारतांत परत आले. परंतु व्यथित मनानेंच! त्यांच्या आकांक्षा काहींकाल तरी छेदल्या गेल्या होत्या!

## स्पृश्यांची अमानुषता

च माझा क्रीडानंद

मुंबईच्या बंदरांत पाऊल टाकतांच लागलीच ते ब

त्यांच्याकडे बडोद्यापर्यंतच्या प्रवासास लागणारे पुरेसे पैसेहि त ती पदवी

द्धतीवर

बडोद्यास पोंचल्यावर मात्र त्यांना निराळा अनुभव आला. बाबासा त्या- आत्मशक्तीला दुखविणारे, माणुसकीच्या मर्मावर घाव घालणारे, अ अस्पृश्यत्वामुळें सामाजिक अवहेलना करणारे अनेक प्रसंग त्यांच्यावर आले. त्यामुळें त्यांच्या सुप्त पण सहिष्णु—संवेदनशील भावना सहनशीलतेचीं बंधनें तुटतांच अणुबॉम्बप्रमाणें उफाळून आल्या. त्यापैकीच एक अनुभव इथें आला. त्यामुळेंच त्यांना बडोदें सरकारची नोकरी करणेंही अशक्य झालें. प. वा. कृष्णाजी अर्जुन केळुसकर यांच्या शब्दांत सांगावयाचें तर—

"येथें आल्यावर कराराप्रमाणें बडोदें संस्थाननें सांगितलेली नोकरी स्वीकारावी लागली. परंतु अस्पृश्यतेच्या खुळामुळें त्यांना नोकरी करणें अति दुर्घट झालें. पहिली गोष्ट अशी कीं, तेथें ते ज्या कचेरींत काम करीत, तेथले स्पृश्य कारकून त्यांच्याकडे कागद दुरूनच फेंकीत असत. आणि त्यांना आपल्या टेबलाला अगर बैठकीला स्पर्श करूं देत नसत. ही मानखंडना पाहून त्यांना अतिशय खेद होत असे. दुसरी गोष्ट अशी कीं, त्यांना राहायला कोठेंच जागा मिळेना. थें एका पारशाचें हॉटेल होतें. त्यात त्यांनीं आपला मुक्काम कांहीं दिवस केला होता. पण कोणी चहाडी केल्यामुळें त्या पारशाला आपली गिऱ्हाइकी जाईल या भीतीनें आमच्या डॉक्टर साहेबांना आपल्या हॉटेलातून काढून लावावें लागलें."

"या बाबतींत महाराजाकडे दोनतीन वेळां बिनंती अर्ज केले, परंतु त्याचा काहीं उपयोग झाला नाहीं. तेव्हां ते मुंबईस परत आले. आणि मला त्यांनीं आपली ही सगळी करुण कहाणी सांगितली. तेव्हां मी या

त्यांना वेडच होतें. ते स्वतःच म्हणतात. ' ज्ञानार्जनांतच माझा क्रीडानंद 'What instructs me, amuses me ! '

लंडन विद्यापीठांत डी. एससी. साठीं सादर केलेला प्रबंध ती पदवी त्यांना बहाल करण्याबाबत वादग्रस्त ठरला. यांत हिंदी चलन पद्धतीवर खरपूस टीका होती. त्यांनीं आपले मौलिक विचार व निष्कर्ष पुरावापुराव्या-निशीं मांडले होते. त्याचे मार्गदर्शक शिक्षक प्रो. एडविन कॅनन हे या प्रबंधाच्या प्रस्तावनेंत म्हणतात—

" मी आंबेडकरांशीं सर्वच बाबतींत सहमत नाहीं. त्यांची विधान-पद्धति मोठी अवखळ आहे. त्यांना जी गोष्ट प्रतिपादन करावयाची आहे ती कठोर युक्तिवादानें मांडतात. जरी मला त्यांचें प्रतिपादन पूर्ण चुकीचें वाटलें तरी त्यामध्यें एक प्रकारचा विचारांचा प्रेरक ताजेपणा आहे ! "

बाबासाहेबांची कठोर युक्तिवादाची आणि प्रतिपक्षावर तुटून पडण्याची वृत्ति प्रो. कॅनन यांना त्यांच्या विद्यार्थीदशेंत आढळली आणि साऱ्या भारताला त्या प्रवृत्तीचा आज पुरेपूर अनुभव येऊन चुकला आहे.

बाबासाहेबाचा हा प्रबंध क्रांतिकारक स्वरूपाचा असल्याचा परीक्षकांचा दावा होता. अर्थातच त्यामध्यें बदल झाल्याशिवाय त्यांना ही पदवी मिळणें अशक्य झालें. शेवटीं प्रो. कॅननच्या सल्ल्यानुसार त्यांत बदल करून तो पुनः सादर केला आणि मग संमत झाला.

यानंतर बाबासाहेबांची जर्मनीला जाऊन कांहीं पदव्या मिळविण्याची मोठी इच्छा होती. पण द्रव्याभावीं त्या गोष्टी त्यांना साधल्या नाहींत. तसें झालें तरी त्यांची ज्ञानलालसा आजहि तसूभर कमी झाली नाहीं. असा हा अगम्य ज्ञानोपासक आहे.

## प्रत्यक्ष कृतीची वेळ !

बाबासाहेबांच्या जीवनांत ते केवळ जन्मानें अस्पृश्य असल्यामुळें उच्च-वर्णीय हिंदूनीं त्यांचा अपमान केला आणि तुच्छतेनें वागविलें. ही हिंदूंची गेल्या शेकडों वर्षांची परंपरा आहे. जातीय विषमतेवर हिंदुधर्माचा डोलारा उभा आहे. त्याचा पाया मनुस्मृति, गीता, उपनिषदें, पुराणें या धर्मग्रंथांनीं घातला गेला आहे. याचें पूर्ण आकलन यावेळीं बाबासाहेबांना झालें. अस्पृश्यावर लादलेली ही नीच गुलामगिरी आहे याचें त्यांना प्रत्यंतर आलें. या गुलामगिरींतून 'मुक्ति कोन पथे ?' याचा विचार ते सतत करूं लागले.

त्यांनीं संपादिलेल्या विद्वतेमुळें कुणाही समाजाला त्यांच्याबद्दल अभिमान वाटला असता. महाराष्ट्राचा महार आपल्या समाजांत जन्मलेल्या हिऱ्याला न पारखण्याइतका मठ्ठ नव्हता. त्यांच्या डोळ्यांत या हिऱ्याचें तेज चमकलें. तो हिरा सामाजिक आणि राजकीय आघाडीवर ठेवून आपला स्वातंत्र्य-लढा त्यांनीं सुरू केला. या लढ्याची पहिली चकमक महाडच्या चौदार तळ्यावर झडली. चौदार तळ्यावरील अस्पृश्यांचा सत्याग्रह म्हणजे त्यांच्यावरील सामाजिक गुलामगिरीविरुद्ध उठविलेला पहिला तेजस्वी आवाज ! या तेजस्वी लढ्याचें नेतृत्व बाबासाहेबांनीं केलें.

### चौदारचा सामना

१९२३ सालीं रा. ब. बोले मुंबई कायदेमंडळांत होते. त्यांनीं सामाजिक कुचंबणेबाबत एक ठराव पास करून घेतला. त्याला अनुसरून महाड नगरपालिकेनें चौदार तळें अस्पृश्यादिकांना खुलें केलें. त्यामुळें सनातन्यांचा संताप झाला. पण नगरपालिकेचा हा ठराव तसाच दसरात

पडून होता. सनातन्यांच्या भीतीनें कुणीही अस्पृश्य या ठरावाचा उपयोग करूं शकला नाहीं.

१९२७ सालीं बाबासाहेबांनी या ठरावाची अंमलबजावणी करण्यासाठीं अखिल महाराष्ट्र आणि गुजराथच्या अस्पृश्यांना हांक दिली. चौदार तळ्यावर दहा हजार महारादि अस्पृश्य जमा झाले. 'वीरेश्वर मंडपांत' परिषद झाली. बाबासाहेबांनीं आपल्या अध्यक्षीय भाषणांतून अस्पृश्यता ही हिंदू धर्मानें लादलेली आपल्यावरील सामाजिक गुलामगिरी आहे, हें पटवून दिलें. समाजसुधारणेसंबंधीचे ठराव परिषदेंत पास झाले. सरकारनें अस्पृश्यांना शिक्षण द्यावें, दारुबंदी आणावी, छात्रालयें उघडावीं आणि बोले ठरावाची प्रत्यक्ष अंमलबजावणी व्हावी आणि आवश्यक तर पोलिस कायद्यानें ह्या गोष्टी बजावाव्या, अशा प्रकारच्या मागण्या या ठरावातून मांडल्या.

बाबासाहेबांच्या नेतृत्वाला मोठीच गती येऊं लागली. प्रत्यक्ष कृती करून दाखविण्यासाठीं ते आखाड्यात उतरले आणि जनतेनें त्यांना साथ दिली. सहस्रावधि अस्पृश्यांचा—मुक्यांचा मूक—नायक चौदारचें पाणी पिण्यासाठीं तळ्यांत उतरला आणि ओंजळीनें पाणी प्याला. त्यांच्या मागें हजारों उघडी नागडी, काळी—भोळी, पण मूक—नायकाच्या मंत्रानें मुग्ध झालेली जनता तळ्याचें पाणी पिण्यासाठीं उतरली. चौदार तळ्यावरील हा अविस्मरणीय प्रसंग मोठा स्फूर्तिदायक होता.

दुसऱ्या बाजूनें महाडच्या सनातन्यांचीं डोकीं भडकलीं होतीं. हातात काठ्या घेऊन त्यांचा जमाव तळ्याच्या दिशेने धांवत होता. 'आपला धर्म बुडाला' असें ते ओरडत होते. गांवभर एकच हुल्लड उडाली होती. महारानीं महाड व्यापला होता. गांवांतील स्पृश्यांत एकाएकीं स्फोटक वातावरण निर्माण झाल्यामुळें, सत्याग्रहासाठीं आलेल्या अस्पृश्य स्त्रिया व मुलें यांना मोठी धास्ती वाटली. गांवांत फिरणाऱ्या काहीं अस्पृश्यांना मारही बसला.

मुलें व स्त्रिया यांनीं कांहीं मुसलमानांच्या घरांत आसरा घेतला. परिस्थिती फारच चिघळली. मामलेदार व पोलिस अधिकारी आले. बाबासाहेब पुढें झाले. त्यांनीं सांगितलें कीं, तुम्ही तुमच्या स्पृश्यांना आवरा. माझीं माणसें मी सांभाळतों. इकडे गांवांत सर्वत्र गुंडानी अस्पृश्यांना मारहाण केली. स्त्रिया व मुलें यांनाही मारण्यास त्यानीं कमी केलें नाहीं. गांवांत चाल-लेल्या हुल्लडीची वदंता परिषद मंडपापर्यंत पोंचली. बाबासाहेबांना यांतून मार्ग काढणें आवश्यक होतें. बाबासाहेबांच्या थोड्याशा चिथावणीनेंही सारा महाड रणांगण झाला असता, रक्ताचे पाट वाहिले असते, पण बाबासाहेबांनीं धीरपुरुषाला साजेल असा संयम पाळला.

स्पृश्यांच्या कोपाचें खरें कारण असें होतें कीं, चौदार तळ्याचें पाणी पिणें, हाच अस्पृश्यांचा हेतु नसून ते वीरेश्वराच्या मंदिरांत प्रवेश कर-णार आहेत अशी एक हूल कोणीतरी उठविली होती.

शेवटीं महाडच्या सत्याग्रहांत झालेल्या दंगलीची चौकशी झाली. स्पृश्य गुंडांना शिक्षाही झाली. निदान न्यायदेवता तरी अस्पृश्यांच्या बाजूची होती हें त्यांचें नशीबच म्हणायचें !

महाडचा सत्याग्रह अशा तऱ्हेनें यशस्वी झाला हें सनातन्यांना कसें आवडावें ! त्यांनीं सर्व सनातनी स्पृश्यांची सभा वीरेश्वराच्या देवळांत घेतली. आणि चौदार तळ्याचें शुद्धीकरण करण्याचें ठरविलें. केवळ भट-जींच्या मंत्रानें होणारें शुद्धिकरण म्हणजे बाबासाहेबांना आव्हान होतें. या शुद्धिकरणानें अस्पृश्य समाजाला आणखी चेव आला. आणि त्यांनीं या शुद्धिकरणानंतर चौदार तळ्यावर पुनः सत्याग्रह करण्याचें ठरविलें. यावेळीं अस्पृश्यांच्या सत्याग्रहाला विरोध करूं नये म्हणून पुण्याच्या ब्राह्मणांनीं महाडच्या स्पृश्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न केला, परंतु तो यशस्वी झाला नाहीं. सुधारकांचें कांही चाललें नाहीं.

## पुनश्च चौदार सत्याग्रह

पुनः एकदां स्पृश्य आणि अस्पृश्य चौदार तळ्यावर एकमेकांविरुद्ध उभे राहिले. २१ डिसेंबर १९२७ पासून सत्याग्रही जमूं लागले. आंबेडकर आपल्या साथीदारांसह आले. पोलिस अधिकारी हा सत्याग्रह लांबणीवर टाकण्यासाठीं विनवूं लागले. न्यायालयानें बंदी आणली. पण सत्याग्रह मागें घ्यायचा नाहीं असें ठरलें. तीन हजार सत्याग्रही महाडला वाट पहात होते. परिषद सुरू झाली. सत्याग्रह यशस्वी व्हावा म्हणून अनेक संदेश आले होते.

मुंबईत स्थापन झालेल्या बहिष्कृत हितकारिणी सभेमार्फत बाबासाहेबांनीं आपल्या लढ्याची जय्यत तयारी केली होती. त्यांच्या प्रभावी नेतृत्वावर अस्पृश्यांची दृढ निष्ठा होती. त्यांच्या आदेशाप्रमाणें वाटेल तो त्याग करण्याची त्यांची तयारी होती. यावेळेला सत्याग्रह अधिक शिस्तबद्ध होता. या सत्याग्रहाचें एक मोठे वैशिष्ठ्य म्हणजे ३००० स्त्रियांनींही यात भाग घेतला होता. भारतांतील हा एकमेव प्रसंग होय. बाबासाहेबांचें नेतृत्व तेव्हां पुरुषापुरतेंच नव्हे तर चुलीपर्यंत जाऊन भिडलें होतें. महाड गावांतून जेव्हां सत्याग्रहांची मिरवणूक निघाली तेव्हां भयचकित स्पृश्यांनीं दारें खिडक्या लावून घेतल्या होत्या.

सत्याग्रहाचें स्वरूप भयंकर आहे हें स्पृश्यांना ठाऊकच होतें. सरकारी अधिकाऱ्यानाही त्याची जाणीव होती. स्पृश्यांना हा सत्याग्रह होऊं द्यावयाचा नव्हता. पण अस्पृश्यसमाजानें फारच उचल खाल्ली. स्पृश्यांना येवढ्या समूहाशीं दोन हात करणें अशक्य होतें.

या सत्याग्रहाच्या परिषदेंत जिल्ह्याचें अधिकारी—कलेक्टर बोलणार होते. त्यानीं बाबासाहेबासमोर एक कायदेशीर पेंच टाकला. सत्याग्रह पुढें ढकलण्यास भाग पाडलें. सरकारी ठरावाप्रमाणें सार्वजनिक जागेचा अस्पृश्यादिकांना उपभोग मिळाला पाहिजे हें त्यानाही मान्य होतें. पण पाहिल्या

सत्याग्रहानें अस्पृश्यांनीं आपला पराजय केला म्हणून सूड घेण्यासाठीं महाडच्या कांहीं धूर्त स्पृश्यांनीं चौदार तळें आपली खाजगी मालमत्ता असल्याची कोर्टांत फिर्याद दाखल केली. त्याचा निकाल लागेपर्यंत सत्याग्रह बेकायदा ठरवावा लागेल, असें त्यांनीं सांगितलें.

आता मात्र इलाज नव्हता. सर्वांच्याच उत्साहावर विरजण पडलें. तरीहि बाबासाहेबांनीं आपला अस्पृश्यतेविरुद्ध पुकारलेला लढा अव्याहत चालविण्याचा आदेश देऊन हा सत्याग्रह कोर्टकचेरीच्या निर्णयापर्यंत लांबणीवर टाकला.

महाडच्या सत्याग्रहानें अस्पृश्यांची चळवळ नांवारूपास आली आणि भारतीय राजकारणांत आणि सामाजिक चळवळींत बाबासाहेबांसारखा एक तेजस्वी पुरुष आपल्या प्रभावी नेतृत्वानें तळपूं लागला. बाबासाहेबांचें दलित जागृतीचें कार्य आता फारच जोरानें चालूं लागलें. '**बहिष्कृत भारत**' हें साप्ताहिक त्यांनीं चालविलें व त्यामुळें आपल्या चळवळीला बळकटी आणली. मुंबईप्रांताबाहेरही बाबासाहेबांच्या नेतृत्वाची बोलबाला झाली.

## सायमन कमिशन

याच वेळीं राष्ट्रीय सभेची—कॉंग्रेसची—स्वातंत्र्य चळवळ जोर धरूं लागली होती. ब्रिटिशशाहीला त्याची भीति वाटूं लागली होती. १९१९ च्या भारताच्या कायद्यांत फेरबदल करून भारताला राज्यकारभारांत अधिक सवलती द्यावयाचें ब्रिटिशांनीं योजलें आणि सायमन कमिशन नेमलें. राजकीय, सामाजिक, औद्योगिक सर्व क्षेत्रांतील प्रमुख व्यक्तींना या कमिशनसमोर साक्ष देण्यास बोलाविलें. बाबासाहेबांनासुद्धां अस्पृश्य जमातीचे प्रतिनिधी म्हणून साक्ष देण्यास सांगितलें. बहिष्कृत हितकारिणी सभेच्या वतीनें त्यांनीं आपलें म्हणणें त्यांच्यापुढें मांडलें.

सायमन कमिशनच्या सभासदांनीं बाबासाहेबांना विचारलेल्या प्रश्नांचीं उत्तरें मोठ्या मार्मिकतेनें दिलीं. मागासलेले आणि अस्पृश्य हे एकच आहेत हें त्यांनीं स्पष्ट केलें. मुंबईच्या कारभारांत अस्पृश्य अगदीं स्वतंत्र असा अल्पसंख्य गट असावा ! त्याचें मुख्य कारण हेंच कीं, हा वर्ग शैक्षणिक दृष्ट्या अगदींच मागासलेला आहे, आर्थिक दृष्ट्या दरिद्री आणि सामाजिक दृष्ट्या शतकानुशतकांचा गुलामगिरींत खितपत पडलेला आहे. राजकीय हक्क म्हणजे काय हेंसुद्धां या समाजाला अजून उमगलेलें नाहीं, एवढें त्याना अज्ञानांत ठेवलें आहे. प्रौढमतदानपद्धती सुरू झाली तर आपल्याला राखीव जागा पाहिजेत अशीही मागणी त्यानीं या कमिशन समोर मांडली.

या कमिशन पुढील कांहीं प्रश्नोत्तरें पहा—

प्रश्नः—प्रौढमतदानपद्धती अंमलांत आली तर तुमचा मागणा कोणता ?

उत्तरः—अस्पृश्यांचे स्वतंत्र मतदार संघ स्थापावेत.

प्रश्नः—सरकारी सार्वजनिक नोकऱ्यांत अस्पृश्याना द्यावें, हा तुमचा आग्रह कां ?

उत्तरः—कायद्याच्या अंमलबजावणींत दलित जनतेवर अधिक अन्याय केला जातो असा आमचा नेहमींचा अनुभव आहे, त्याला आळा बसेल.

प्रश्नः—'दलित वर्ग' याची निश्चित व्याख्या काय ?

उत्तरः—ज्या जाती पिळल्या जातात तो वर्ग.

प्रश्नः—[illegible] यांच्यामध्ये आंतर्जातीय विवाह होतात का ?

उत्तरः—नाहीं. स्पृश्य हिंदूंनीं जातिभेदाचें हें विष खालच्या वर्गांतहि वा[illegible]लें आहे.

प्रश्नः—त्याचा परस्पर रोटीव्यवहार चालतो ?

उत्तरः—आतांशा कुठें कुठें चालतो.

प्रश्नः—दलित वर्गीय 'हिंदू' आहेत असें आपण समजतां का ?

उत्तर :—दलितवर्गाला काय समजतात याच्याशीं मला कांहींच कर्तव्य नाहीं. मला हिंदू म्हटलें काय आणि अहिंदू म्हटलें काय सारखेंच ! कारण मी हिंदुत्वांत सामावत नाहीं.

प्रश्न :—तुम्ही हिंदुत्वात सामावत नसाल तर हिंदु-कायदा आपल्याला लागू नाहीं...मग आपले व्यवहार कोणत्या कायद्यानें होतात.

उत्तर :—हिंदु कायदाच आमच्यावर शासन करतो.

हिंदू समाजसेवक केवळ व्यासपीठावरील भाषणें करतात, पण खरी सुधारणा करीत नाहींत, असेंहि त्यांनीं प्रतिपादिलें. बाबासाहेबांची सायमन कमिशन पुढील साक्ष पुढील राजकीय घटनांच्या दृष्टीनें अगदी खळबळजनक ठरली आणि भारतीय राजकारणात बाबासाहेब कॉंग्रेसचे व गांधींचे निष्ठूर प्रतिस्पर्धी म्हणून वावरूं लागले.

आपल्या चळवळीला अधिक उजाळा यावा म्हणून बाबासाहेबांनीं सत्याग्रह चळवळ चालूच ठेवली. या सत्याग्रहापैकीं नाशिकचा काळाराम मंदीर प्रवेश सत्याग्रह फारच गाजला. सनातनी स्पृश्यांच्या मनांत या सत्याग्रहामुळें अस्पृश्याबद्दल एक प्रकारची तेढ निर्माण झाली. त्यांच्या मुलांना शाळातून हांकलून लावलें. बाजारांत वस्तू कोणी विकत देईना. आणि खेड्यापाड्यांतून त्यांची जांचणूक झाली. तरीही अस्पृश्यांनीं ही सत्याग्रह चळवळ बंद केली नाहीं. शेवटीं पुजाऱ्यानी काळाराम मंदिराचा दरवाजाच वर्षभर बंद करून रामालाच तुरुंगवासांत टाकलें.

## पहिली गोलमेज परिषद

यानंतर ब्रिटिशांनीं जाहीर केल्याप्रमाणें गोलमेजपरिषद बोलाविली. एकूण ८९ प्रतिनिधी या परिषदेंत भाग घेण्यासाठीं गेले. बाबासाहेब दलितवर्गाचे प्रतिनिधी म्हणून गेले. २ ऑक्टोबर १९३० रोजीं थैली अर्पण करून अस्पृश्य समाजानें कृतज्ञतापूर्वक त्याची परिषदेस रवानगी

केली. जाताना त्यानीं सांगितलें कीं, 'स्वराज्याबरोबर माझ्या जनतेचे हक्क मला मिळाले पाहिजेत, असाच अट्टाहास मी करीन.'

१२ नोव्हेंबर १९३० रोजीं गोलमेज सुरू झाली. ब्रिटनच्या बादशहानीं उद्‌घाटन केलें. या परिषदेचे अध्यक्ष म्हणून त्यावेळचे भारतमंत्री मि. रॅम्से मॅक्डोनॉल्ड यांची निवड झाली. सप्रू, जयकर, मुंजे, जीना, बिकानेरचे महाराज व बाबासाहेब यांचीं भाषणें फारच गाजलीं. आंबेडकर भारतातील दीन मानवतेचे प्रतिनिधी होते. त्यानीं आपल्या भाषणात भारतीयामध्यें वस्तीनें ⅙ असलेल्या दलित जनतेची कशी पिळणूक होत आहे त्याचें चित्र त्याच्यासमोर उभें केलें आणि ब्रिटिश सरकारला तडक सवाल केला कीं, त्यांनीं अस्पृश्यांच्या—दलितांच्या विकासासाठीं कांहींहि केलें नाहीं. ब्रिटिशपूर्व काळात आमची जी दैना होती तीच आहे व त्यात कांहीं फरक नाहीं, असें प्रतिपादन केलें. 'आमचीं दुःखें आमच्याखेरीज दुसरा कोणीहि निवारूं शकणार नाहीं. त्यासाठीं आम्हांला आमचे राजकीय हक्क आमच्याच हातात पाहिजेत. या राजकीय हक्कांची जादू काय असते तें पहाण्यासाठीं आम्ही आतुरलों आहोंत व आतापर्यंत फारच वाट पाहिली आहे.'

## ब्रिटिश सरकारवर टीका

पुढें आपल्या भाषणाचा शेवट करण्यापूर्वी ब्रिटिश सरकारला अशी ताकीद दिली कीं, 'बहुसंख्य जनतेला मान्य नसेल तर कोणतीच घटना कार्यक्षम होऊं शकणार नाहीं. ब्रिटिशानीं मन मानेल तसें भारतावर राज्य करावें, हे दिवस गेले ते पुनः परतणार नाहीत. जनतेची इच्छा समजून घेऊन घटना व्हावी. केवळ युक्तिवादाचीं तर्कटें विचारांत घेऊं नयेत. तरच हीं पुनर्घटना कार्य करील.'

बाबासाहेबांच्या या धीट टीकेचा सर्वांवर अद्‌भूत परिणाम झाला. पुष्कळांनीं त्यांचें त्याबद्दल अभिनंदन केलें. आणि सर्वांत मोठा योगायोग

म्हणजे त्याच दिवशीं बडोद्याच्या गायकवाड महाराजांनीं आपल्याकडे त्यांना जेवणाचें आमंत्रण दिलें. किती नाट्यपूर्ण प्रसंग !

'भारतांतील दलितांचा प्रश्न' ही गोलमेज परिषदेंतील बिकट समस्या झाली होती. साऱ्या जगाचे डोळे या समस्येकडे लागले होते.

१९ जानेवारी १९३१ रोजीं गोलमेज परिषद तात्पुरती स्थगित झाली.

गोलमेज परिषदेच्या पहिल्या फेरींत बाबासाहेबांचें नांव दिगंत झालें, त्याबरोबर भारतांतील अस्पृश्यांना मिळणाऱ्या वागणुकींत फरक पडला. कॉंग्रेसला आतां दलितांची अधिक दया येऊं लागली. मुंबई पोलिस-खात्यांत अस्पृश्यांचा शिरकाव होऊं लागला.

## दुसरी गोलमेज परिषद

गोलमेज परिषदेच्या दुसऱ्या अधिवेशनांतील प्रतिनिधींचीं नांवें जाहीर झालीं. बाबासाहेबही या प्रतिनिधींत निवडले गेले होते. आणि त्यांची केंद्रिय घटनासमिती ( Federal Structure Committee ) वर निवड झाली होती. त्यामुळें बाबासाहेबावर देशाच्या आणि परदेशाच्या कोना-कोपऱ्यांतून स्तुतिसुमनाचा आणि अभिनंदनाचा वर्षाव झाला.

या खेपेला गांधीजी गोलमेजला कॉंग्रेसचे अग्रणी म्हणून जात होते. बाबासाहेबांनीं पहिल्या वेळीं जी समस्या निर्माण केली ती त्यांना सोडविणें अवघड होतें. भारताचा किनारा सोडण्यापूर्वी बाबासाहेबाना भेटावें अशी इच्छा त्यांनीं प्रगट केली. त्याप्रमाणें बाबासाहेब आजारी असताही त्याना भेटण्यास गेले. भेटीची घटना व त्यावेळीं झालेले संवाद विस्तारानें दिले तर बाबासाहेब व गांधी याच्यातील तेढीची मुहूर्तमेढ याच प्रसंगीं कशी पडली आणि त्यानंतर अखंड राजकारणात त्यांचें व गाधीजींचें कधींच का पटलें नाहीं हें सहज समजून येण्यासारखें आहे.

बाबासाहेब आपल्या दोनतीन साथीदारासह मलबार हिलवरील मणिबेन भुवनामध्यें गेले. गांधीजी चटईवर बसले होते. कोणाशीं तरी त्यांची चर्चा चालली होती. अंत शिरताच बाबासाहेबानीं त्यांना नमस्कार केला. पण

गांधींनी त्याच्याकडे नुसतें बघितल्यासारखें केलें, आणि आपल्या चर्चेत गुंग ..ले. आपल्या बाबत गांधीजी बेफिकिरपणा दाखवित असावेत अशी शंका त्यांना सहज चाटून गेलीच ! त्यांची व गांधींची ही पहिलीच भेट. आतां ते बाबासाहेबांकडे वळले व इकडच्या तिकडच्या औपचारिक प्रश्नोत्तरानंतर विषयाकडेही वळले.

## गांधी व काँग्रेसला विरोध कां ?

गाधीजी:—बरें, कसें काय डॉक्टर, आपल्याला काय म्हणावयाचें आहे या बाबतींत ?

बाबासाहेब:—तुमचें म्हणणें ऐकून घेण्यासाठीं तुम्ही मला बोलावलेंत तुम्हांला काहीं सागावयाचें आहे का ? तसे नसेल तर तुम्ही काहीं प्रश्न विचारा मी उत्तर देईन.

गाधीजी:—(बाबासाहेबांकडे करड्या नजरेनें पहात) मी व काँग्रेस यासंबंधी आपल्या मनात काहीं अढी आहे, असें मी ऐकलें आहे. पण तुम्हांला मी सांगूं इच्छितों कीं, तुम्ही जन्मलां नव्हतां तेव्हांपासून अस्पृश्यतेच्या प्रश्नावर मी विचार करीत आलों आहें. काँग्रेसच्या रचनात्मक कार्यक्रमांत अस्पृश्यतेचा प्रश्न अंतर्भूत करण्यासाठीं मला केवढे श्रम पडले आहेत याची कदाचित् आपल्याला दखल असेलही. ही सामाजिक सुधारणेची बाब आहे व ती गोष्ट राजकीय कार्यक्रमांत घुसडूं नये म्हणून कित्येक काँग्रेस पुढाऱ्यांनीं मला जोराचा विरोध केला. इतकेंच कांहीं नव्हे ! आतांपर्यंत अस्पृश्यता निवारणासाठीं काँग्रेसनें वीस लाख रुपये खर्च केले आहेत. आणि तुमच्यासारख्यांनी मला व काँग्रेसला विरोध करावा हें आश्चर्यकारक होय ! आता तुमची बाजू आम्हाला तुम्ही सांगूं शकता.

बाबासाहेब:—माझ्या जन्मापूर्वींपासूनच आपण अस्पृश्यतेचा विचार करतां हें खरें आहे, महात्माजी ! वयोवृद्धानीं आपल्या वयाचा टेंभा मिरवावा हें क्रमप्राप्तच आहे आणि तुमच्यामुळेंच काँग्रेसमध्यें आमच्या

प्रश्नाला मान्यता मिळाली हें पण खरें आहे. पण तुम्हांला हें स्पष्ट सांगूं इच्छितों कीं, कॉंग्रेसनें दलितोद्धाराला दिलेली मान्यता केवळ वरकरणी आहे, नांवापुरतीच आहे. तुम्ही म्हणाला कीं, कॉंग्रेसनें वीस लाख रुपये अस्पृश्योद्धारासाठीं खर्च केले, पण मी म्हणतों हा एवढा पैसा अक्षरशः पाण्यांत बुडविलात तुम्ही. एवढें द्रव्यसहाय्य माझ्यासारख्याला लाभलें असतें तर माझ्या लोकांची आर्थिक पातळी मी वाढविली असती, त्यांचा जगाकडे पहावयाचा दृष्टिकोनच मी बदलून टाकला असता व कदाचित् असें घडलें असतें तर आपल्या भेटीचा योगही यापूर्वींच आला असता. पण कॉंग्रेस आपल्या कार्यक्रमाशीं आणि कृतीशीं प्रामाणिक नाहीं हें मला तुम्हांला निक्षून सांगावयाचें आहे. तशी ती प्रामाणिक असती तर कॉंग्रेस सभासदाला आजची जी खादी वापरण्याची अट आहे त्याऐवजी एखाद्या अस्पृश्याला घरीं कामाला ठेवण्याची किंवा एखाद्या अस्पृश्य विद्यार्थ्याला आठवड्यांतून एखादें जेवण घालण्यासंबंधीची अट टाकली गेली असती आणि जिल्हा कॉंग्रेस कमिटीच्या अध्यक्षस्थानीं विराजमान झालेला कॉंग्रेसवाला आज अस्पृश्यांच्या मंदिर–प्रवेशाला विरोध करतो तो देखावा आमच्या तुमच्या नजरेसमोर राहिला नसता.

तुम्ही म्हणाल कीं, कॉंग्रेसला संघटन करावयाचें आहे. अशा प्रकारची अट शहाणपणाची ठरणार नाही. मग माझा मुद्दा असा कीं, कॉंग्रेस तत्त्वापेक्षा बलवान् बनण्याचीच अधिक फिकिर करते असें म्हणावें लागेल. तुम्ही व तुमच्या कॉंग्रेस विरुद्ध माझा हा आक्षेप आहे. तुम्ही म्हणतां ब्रिटिशसरकार हृदयपालट दाखवीत नाहीं. मी म्हणतो स्पृश्य सनातनी अस्पृश्यांच्या हक्काबाबत हृदयपालट दाखवित नाहींत. आणि जोपर्यंत ते असे मगरूर रहाणार असतील, तोपर्यंत मी कॉंग्रेस किंवा हिंदु यावर विश्वास टाकायला तयार नाही. आम्ही स्वावलंबन आणि स्वाभिमान यांवर अधिक भर देतों. मोठ्या पुढाऱ्यावर आणि महात्म्यांवर आमची मदार नाहीं मी निष्ठुरपणें पण स्पष्ट सांगतों

कीं, महात्मे चक्रीवाऱ्यासारखे धूळ उडवितात. पण उंची वाढवत नाहींत हें इतिहास सांगतो. काँग्रेसनें मला विरोध करून द्रोही म्हणून माझी नालस्ती का बरें करावी ?

## मला मायदेश नाहीं !

यावेळीं त्यांना गहिंवरून आलें. त्यांचा चेहरा मलूल झाला. डोळे ओलावले होते. थोडा वेळ ते थबकले आणि पुनः कटु आणि तिरस्कार-युक्त स्वरात बोलले, ' गांधीजी, मला माझी अशी हक्काची भूमि नाहीं—मला मायदेश नाहीं.

गांधीजी—( संभाषण तोडण्याच्या हेतूनें ) कोण म्हणतो तुम्हाला मायभूमि नाहीं म्हणून ! गोलमेज परिषदेंत आपण बजावलेली कामगिरी माझ्या कानांवर आली आहे. खरोखरच आपली देशभक्ती मोलाची आहे.

बाबासाहेब—तुम्ही म्हणता मला मायदेश आहे ! पण मी पुनः सांगतों मला मायदेश नाहीं. ज्या देशांत कुत्र्यामांजरापेक्षांही हीन दर्जाची वागणूक आम्हां मानवांना मिळतें, जिथें तहानेला पाणी मिळत नाहीं, तो देश माझा आहे, तो धर्म माझा आहे असें मी कसें म्हणूं ? एकही स्वाभिमानी अस्पृश्य या देशाला आपली मायभूमि म्हणण्याला तयार होणार नाहीं. जिथें अन्यायाचा कळस झाला आहे, दुःखाचे डोंगर आम्हांपुढे आडवे आहेत, तिथें जाणून किंवा अजाणतां या देशाबद्दल निष्ठा दाखविली गेली नाहीं तर त्याचें दोषारोपण सर्वस्वीं त्या देशालाच लावावे लागेल. मला कुणी देशद्रोही म्हटल्याबद्दल मुळींच वाईट वाटत नाहीं. मला देशद्रोही म्हणणाऱ्या देशभक्तावरच माझ्या या बदनामीची जबाबदारी पडत आहे. माझ्याकडून काहीं राष्ट्रसेवा किंवा देशकार्य झालें असें तुम्हीं म्हटलें तें मनोमन असलें किंवा खरें असेल तर तें माझ्या राष्ट्रभक्तीच्या भावनमुळें झालें नसून माझ्या अंतर्यामीं वसणाऱ्या सद्सद्विवेकबुद्धीमुळें झालें आहे. युगानुयुगें पददलित होऊन खितपतणाऱ्या माझ्या समाजाला माणुसकीचे हक्क

मिळवून देण्यासाठीं या देशाशीं इमान राखतां आलें नाहीं तरी तें मला पाप वाटणार नाहीं. आणि मी जर काहीं देशहानीकारक केलें नसेन तर तें केवळ सदसद्विवेकबुद्धिमुळेंच. त्यामुळेंच तर मी माझ्या लोकांच्या माणुसकीच्या हक्कासाठीं झगडत आहें, तडफडत आहें. मग त्यामुळें देशाचें काय होत आहे, हें पहायला मला उसंत नाहीं.

यावेळीं वातावरण अगदीं गंभीर झालें होतें. चेहरे उतरून गेले. गांधीजी विचलित झाले. त्याना बाबासाहेबाच्या विषयाला फाटा द्यायचा होता. आणि याचवेळीं या भेटीचा जो उद्देश त्यासंबंधाचा बाबासाहेबांनीं मोठा बोचक प्रश्न विचारला.

बाबासाहेब :—प्रत्येकाला माहित आहे कीं, मुसलमान आणि शीख सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिकदृष्ट्या अस्पृश्यांहून कितीतरी पुढार-लेले आहेत. गोलमेजपरिषदेच्या पहिल्या अधिवेशनांत मुसलमानाना त्यांच्या मागण्या मिळाल्या. राजकीय संरक्षण मिळालें. कॉंग्रेसनें या गोष्टीला मान्यता दिली. त्याचप्रमाणें दलितवर्गालाही त्यांच्या राजकीय हक्काचें संरक्षण आणि त्याचें योग्य तें प्रतिनिधित्व राखलें जाण्याचें आश्वासन मिळालें आहे. आम्हांला तें अत्यंत हितकारी वाटतें. आपलें काय मत ?

गांधीजी :—अस्पृश्यांची आणि हिंदूंच्या राजकीय हक्काबाबत फारकत करण्यास माझा विरोध आहे. आत्मघात करून घेण्यासारखें आहे तें !

बाबासाहेब :—(उठून) आपल्या स्पष्टोक्तीबद्दल मी आपला आभारी आहें. आपल्या मुख्य प्रश्नाबाबत तुमचा आणि आमचा कल काय आहे तें मी ओळखलें. मी आपली रजा घेतों.

बाबासाहेब बाहेर पडले. पुनः कधीं त्यांचें व गांधीजींचें पटलें नाहीं. बाबासाहेबाच्या संघटनाबलाची, प्रतिस्पर्ध्याला चीत करण्याची व विरोधाला धिम्मेपणानें तोंड देण्याची त्यांची कुवत गांधीजींनीं कधींच ओळखली नाहीं.

कॉंग्रेसचे प्रतिनिधि म्हणून अस्पृश्यांच्या प्रश्नाबाबत गांधीजी कोणती भूमिका मांडणार होते, याची बाबासाहेबांनाहि चांगली कल्पना आली होती.

गोलमेज परिषदेचें दुसरें अधिवेशन लंडन येथें ७ सप्टेंबरला सुरू झालें. गांधीजी या अधिवेशनात प्रतिनिधी होते, हेंच या परिषदेचें आकर्षण होतें.

अपेक्षेप्रमाणें गांधीजींनी दलितवर्गाच्या प्रश्नाबाबत आपली भूमिका मांडली. पहिल्या दिवशीं 'केंद्रघटना समिती'मध्यें झालेल्या भाषणांत बाबासाहेबांनीं संस्थानीं जनतेची बाजू मांडली. अशी बाजू घेणारे ते एकमेव प्रतिनिधी होते. या स्फोटक भाषणानें सर्वांचे डोळे त्यांच्याकडे वेधले गेले.

## बाबासाहेब दलितांचे कैवारी!

मुसलमानांच्या मागण्या गांधींनीं बिनशर्त मान्य केल्या. उलट दलितवर्गीयांना 'स्वतंत्र मतदार संघ आणि राखीव जागा' याव्यात, ही बाबासाहेबांची मागणी त्यांनीं दुराग्रहानें झुकारून लावली. एकवार 'संयुक्त मतदार संघ व राखीव जागा' ही मागणी मान्य झाली असती पण 'स्वतंत्र मतदारसंघ आणि राखीव जागा' गांधीना मुळींच मान्य नव्हती. पण बाबासाहेबांनीं दलितवर्गाच्या दुःखांची व त्यांच्या करुण जीवनाची सत्यकथा त्यांच्यापुढें निधडेपणें, काळजाच्या तडफडीनें सांगितली. दगडालाहि पाझर फुटला असता! तीं तर माणसेंच होतीं. या अधिवेशनांतील बाबासाहेबांची आपली बाजू मांडण्याची तडफ व चातुर्य अद्वितीय होतें. परिषदेचे अध्यक्ष मि. मॅक्डोनॉल्ड म्हणाले, 'आंबेडकरानीं आपली बाजू स्पष्ट मांडली आहे व त्यांत शंकेला जागा राहिली नाहीं.'

"बाबासाहेबांसारखे दलितांचे खरखुरे प्रतिनिधी गोलमेज परिषदेंत नसते तर दलितांच्या राजकीय स्वातंत्र्याला कायमचें ग्रहण लागलें असतें. हा मोका साधून बाबासाहेबानीं भारतीय दलिताची स्थिति जगाच्या चव्हाट्यावर मांडली. त्यांना माणसांत आणण्यासाठीं गांधींशीं निकराचा झगडा दिला. या झगड्याचें वर्णन मि. ग्लोनें बोल्टन करतो कीं—

गोलमेजपरिषदेंत बाबासाहेबांचें व्यक्तिमत्व प्रकर्षानें झळकूं लागलें. भारतीय अस्पृश्याची दैना हें त्यांचें सूत्र होतें. त्याची भूमिका समाजबाधाची असो वा मवाळाची असो त्यानीं भारताच्या कल्याणाबाबत जीं भाषणें केली त्यांत अस्पृश्यांच्या दुःस्थितीचें हृदयस्पर्शी चित्र उमटलें आहे. आंबेडकरांच्या वक्तव्यात व्यवहाराचा कणखरपणा नसून मानवतेचा कनवाळूपणा आहे. अस्पृश्यांचा कैवारी असल्याचें इंग्लंडमधील प्रत्येकाला गांधींजीनीं भासविलें, पण डॉ. आंबेडकरानीं त्याचा हा प्रचार उध्वस्त केला. गांधींचा हा पडता वेळ पाहून पहिल्यापहिल्यादा मुसलमान प्रतिनिधींना मजा वाटे, पण ज्या मोठ्या मानानें गांधी आले त्याचा बोज राखण्यासाठीं तरी आंबेडकरानीं कांहीं दयामाया दाखवावी असें सर्वांनाच वाटूं लागलें.

आंबेडकरांचा व्हॉल्टेअर, मार्क्स किंवा लेनिनच्या तोडीचा हा हल्ला पाहून त्यांच्यावर सर्वत्र टीका होऊं लागली. इंग्रजाचा हस्तक असाही आरोप करण्यांत आला पण कोणत्याहि खोडसाळ प्रकाराच्या भीतीनें ते आपल्या कर्तव्यापासून तसूभरहि ढळले नाहींत.

गोलमेज परिषदेमुळें बाबासाहेबाचें स्थान जागतिक राजकीय मुत्सद्याच्या मालिकेंत गोवले गेलें. परिषद संपण्यापूर्वी इंग्लंडच्या राजानी प्रतिनिधींना दिलेल्या खान्याच्या वेळीं बाबासाहेबांची व त्यांच्या वडिलासंबंधींची खास पुस्तपास्त केली.

बाबासाहेबाच्या गोलमेज मधील विजयानें अखिल दलित जनतेचा आनंद शिगेस पोंचला. त्याच्या महाड सत्याग्रहाचें अनुकरण सर्वत्र होऊं लागलें. व कॉंग्रेसचा दांभिकपणा उघडा पडला. अस्पृश्यांना हिंदूंच्या राजकीय गुलामगिरींत ठेवण्याचा त्यांचा डाव कायमचा हुकला.

अस्पृश्य समाज गांधींचा निषेध करीत होता आणि स्पृश्यसमाज आंबेडकराच्या नावानें काड्या मोडत होता. स्पृश्यास्पृश्यांतील ही तेढ दिवसेंदिवस अधिकाधिक होत गेली.

## पुणें करार

'कम्युनिअल अवार्ड' जाहीर झालें. ब्रिटिशानीं अस्पृश्यांना प्रांतीय सरकारांत राखीव जागा दिल्या आणि निवडावयाच्या आपल्या प्रतिनिधींचें

एक व सार्वत्रिकांपैकीं एक अशी दोन मतें देण्याची पद्धति या अवार्डांत नमूद करण्यांत आली. पण यातील कांहीं भाग बाबासाहेबानाही विसंगत वाटला. त्याचें समाधान झालें नाहीं.

हें 'अवार्ड' भारतीय जनतेंत असंतोष निर्माण करण्यास कारणीभूत झालें. पेंचप्रसंग उद्भवला. याचवेळीं गांधीसह सर्व कॉंग्रेस पुढारी तुरुंगात गेले. येरवडा तुरुंगांतुन गाधीजींनी या अवार्डाबाबत आमरण उपोषण करण्याचें जाहीर केलें. या उपोषणाचें बाबासाहेबावर संपूर्ण दोषारोपण आलें. खरें म्हणजे 'ॲवार्ड' ब्रिटिशानीं दिलें. त्याची दाद तिकडेच मागावयास हवी होती. पण चोर सोडून संन्यासीच फाशी मिळाला.

कॉंग्रेसवाले, गिरणीमालक, तथाकथित अस्पृश्योद्धारक बाबासाहेबाच्या दारीं धूळ झाडूं लागले 'गांधीचे प्राण वाचवा' असें प्रतिपादूं लागले. बाबासाहेब या नवीन परिस्थितीनें अगदींच भांबावून गेले. गांधीचे प्राण वाचले नाहींत तर अखिल भारतीय हिंदूचा रोष आपल्यावर होईल, हिंदूंच्या प्रकोपाला गरीब अस्पृश्यजनता बळी पडेल, असा पेंच त्यांच्यापुढें पडला. पण कर्तव्य निष्ठुर असतें. 'आपले किमान हक्क राखले गेल्याशिवाय आपण कोणत्याही तडजोडीला तयार होणार नाहीं, वाटलें तर त्या जवळच्या दिव्याच्या खांबावर नेऊन मला फांशीं द्या,' असें त्यानीं चक्क सांगितलें.

गांधीजींची प्रकृती चिंताजनक झाली. सर्व पुढारी बाबासाहेबांची मन-धरणी करूं लागले. आतां या प्रश्नांत बुद्धिवादी संयम राहिला नव्हता. भावनेच्या आहारीं गेलेली जनता आंबेडकरावर धमकीपत्राचा पाऊस पाडीत होती. बाबासाहेबांचा निश्चय डळमळला.

पुण्यान पुढाऱ्यांच्या चर्चा सुरूच होत्या. काहीं काळपर्यंत प्रांतिक कायदेमंडळात १४८ जागा आणि मध्यवर्ती सरकारच्या हिंदूच्या १० टक्के जागा अस्पृश्याना देण्याचें ठरलें. पुढें सार्वमत घेऊन ही सवलत काढून टाकावी. पण सार्वमताबाबत पुनः एकमत होईना. होय नाहीं करता दहावर्षेपर्यंत सार्वमत नको असें ठरलें व **पुणें करार** झाला अस्पृश्याच्या चळवळींतील खुषीचा पराजय म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 'पुणें करारा'वर अस्पृश्याच्या वतीनें आंबेडकर व स्पृश्यांच्या वतीनें

पंडित मदनमोहन मालवीय यानीं सह्या केल्या. याशिवाय जयकर, सप्रू बिर्ला, राजगोपालाचारी, राजेंद्रप्रसाद, रावबहादूर श्रीनिवासन्, एम्. सी. राजा, देवदास गांधी, विश्वास, राजभोज, पी. बाळू, गवई, ठक्कर, सोलंकी, सी. मेहता, बखले व कामत इत्यादिंच्या सह्या आहेत. राजाजींनीं हर्षातिरेकानें आंबेडकरांशीं पेनांची अदलाबदल केली, असें म्हणतात.

आंबेडकर एक निधडा राजकीय मुत्सदी होईल असें सर्वांनीच भाकीत केलें.

पुणें करारानें सारा भारत आनंद आणि विस्मय यांनीं घुसळून गेला. कॉंग्रेसनें आपली अस्पृश्योद्धाराची आघाडी अधिक वेगानें दामटली. पण कॉंग्रेसला राजकीय नीतीसुद्धा नाहीं या भावनेनें बाबासाहेब विरमून गेले. त्याचा कॉंग्रेसवरील व कॉंग्रेसच्या हिंदूवरील विश्वास उडाला. हिंदु धर्माचा त्यांना तिटकारा येऊं लागला. हिंदु धर्मांत राहून आपला कधींच उद्धार होणार नाहीं असें त्यानीं सांगितलें.

या दरम्यान १९३६ मध्यें त्यांनीं स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली व औद्योगिक क्षेत्रातहि कामगारांचें मार्गदर्शन केलें. १९३७ सालच्या निवडणुकांत बाबासाहेब व त्यांचे प्रतिनिधी भरघोस यशानें मुंबई कायदेमंडळांत निवडून आले.

बाबासाहेबाच्या कायदेमंडळाच्या बहुविध कामगिरींतील महारवतन बिल हें अपुरें राहिलेलें कार्य होय. महाराष्ट्रातील लक्षावधि महार **'महार वतन'** या क्षुल्लकशा बलुत्याचे परंपरेचे गुलाम बनून राहिले आहेत. गावकामगार म्हणून त्याच्याकडून सरकारी कामें करून घेतलीं जातात. पण प्रत्यक्ष स्पृश्य अधिकाऱ्याची आणि पोलिसपाटलाची गुलमगिरी अहर्निश करावी लागते. त्यासाठीं त्याला पोटाला पुरेसे मिळत नाहीं. ही स्थिती सुधारावी व महारवतनाची गुलामगिरी नष्ट व्हावी म्हणून हें बिल मांडलें. पण तें पडून राहिलें. खोती नष्ट व्हावी म्हणून माडलेल्या बिलाचीही तीच गत झाली.

## भाष्यकार आणि संशोधक

बाबासाहेबांच्या अध्ययनशील प्रज्ञेला भाष्यकाराचें सामर्थ्य आलें होतें. भारताची फाळणी होण्यापूर्वीच त्यांनीं 'Thoughts on Pakistan' हें पुस्तक लिहून पाकिस्तानचें भाकित केलें होतें. कॉंग्रेसच्या राजकीय मुत्सद्यांनीं त्यांच्या या भविष्यवाणीचा सहानुभूतीनें विचार केला असता तर फाळणीच्या काळातील आपत्ति आणि हानी टाळता आली असती. बाबासाहेब राजकारणांतले द्रष्टे पुरुष आहेत हें या गोष्टीनें सिद्ध झालें.

बाबासाहेबांचें इतर साहित्यही असेंच उद्‌बोधक आहे. 'शूद्र पूर्वी कोण होते' हा संशोधनात्मक ग्रंथ त्यांच्या सखोल अभ्यासूपणाचें द्योतक आहे. दलितवर्गीय विद्यार्थ्यांना या ग्रंथातील प्रमाणांच्या आधारें संशोधन करण्याची त्यांनीं आज्ञा केली आहे.

प्राचीन कालापासून ब्राह्मणानीं शूद्रांनीं अध्ययन करूं नये असा निर्बंध घातला. वेदाध्ययन करणें तर सोडाच पण वेदमंत्र ऐकणाऱ्या शूद्राच्या कानात तापविलेलें तेल ओतावें असा हिंदुन्यायशास्त्रांत दंडक सांगितला आहे. या दंडकाचा हेतु स्वार्थी होता. ब्राह्मणांच्या हातीं विद्या रहावी हा त्यांचा मूलभूत हेतू होता. 'विद्या' ही मोठी शक्ति आहे. माणसाला मातीमोल किंवा मोतीमोल करणारी ही विद्या ब्राह्मणाच्या हातीं राहिली. ब्राह्मण हिंदुसमाजांत श्रेष्ठ झाले व शूद्र मात्र मातीमोल ठरले, गुलाम झाले.

धर्मशास्त्रात ज्ञानार्जन करूं नये हा नुसता दंडक नव्हे तर त्याविषयींच्या रूढी निर्माण केल्या. ज्ञानोपवित घालण्याचा विधि—मुंज हा आपल्या पुरताच ठेवला. कालांतरानें तो त्रिवर्णिकांना म्हणजे ब्राह्मण क्षत्रिय व वैश्य यांना मिळाला, पण शूद्रांना मात्र तो कधीं काळीं मिळाला नाहीं. हा ज्ञानोपविताचा विधी व ज्ञान संपादन करण्याचा मार्ग त्यांनीं बंद केल्यामुळें आपल्यावर गुलामगिरी आणि अस्पृश्यत्व आलें, असें बाबासाहेबांनीं वरील ग्रंथांत साधार सिद्ध केलें आहे. आजकालचे इतिहाससुद्धां त्यांनीच लिहिले असल्यानें ते एकांगी व खोडसाळ आहेत.

व म्हणूनच आपल्यांतील हुशार ज्ञानोपासकांनीं आपला प्राचीन काळचा इतिहास शोधावा असा त्यानी या ग्रंथाच्या प्रस्तावनेंत आग्रह केला आहे.

परवा परवाच बाबासाहेबाचें राज्य पुनर्रचनेवर जें पुस्तक प्रसिद्ध झालें आहे तें असेंच उद्‌बोधक आहे. एका समीक्षकाच्या शब्दांत सांगावयाचें तर 'शब्द थोडे पण अर्थ अधिक' असें या पुस्तकाचें वर्णन करतां येईल. चालू राजकीय पेंचप्रसंग सोडविण्यासाठीं त्यांनीं आपला उपाय सुचविला आहे. कित्येकांना त्याचे हे विचार विसंगतीचे वाटतात. मागें ते काय बोलले त्याच्याशीं नवीन विचारांची तुलना करतात.¹ पण अशा टीकाकाराना ते म्हणतात—सुसंगति हा गाढवाचा गुण आहे व मला कांहीं स्वतःला गाढव बनवून घ्यायचें नाहीं. विचारी माणसाला आपल्या विचारांत योग्य सुधारणा घडवून आणता आली पाहिजे. विचार हे कांहीं सदासर्वकाळ 'ठशासारखे' कायम स्वरूपाचे नसतात. त्यांना मर्यादा नसते असें त्यानीं चक्क सांगून टाकलें आहे.

बाबासाहेबाच्या डोक्यांत कितीतरी विषय लिहिण्यासाठीं गलका करून आहेत. पण पुष्कळदां कामाच्या गर्दीत व हल्लीं प्रकृतिस्वास्थ्य नसल्यानें मनात असूनही हें लिखाण त्याना करणें अवघड झालें आहे. त्यांतही त्यानीं 'बुद्धधर्मा' वर एक पुस्तक लिहिलें असल्याचें समजतें. हें पुस्तक जागतिक बौद्धधर्मीयांना आपलें 'बायबल' वाटावें इतकें उत्कृष्ट झाल्याचेंहि समजतें. ज्या दिवशीं तें प्रकाशित होईल तो सुवर्ण-दिनच होय.

महात्मा फुले हे त्यांचे एक गुरु. हें त्यांच्या बालपण परिचयांत सांगितलेंच आहे. त्यांच्या जीवनावरही ते लिहीत होते. तेंही लिखाण संकल्पितच होय. थोडक्यांत या मानवी ज्ञानभांडारातील जितकें ज्ञान दलित जनतेच्या कल्याणासाठीं 'दान' केलें जाईल, तितका दलिताचा नैतिक दर्जाहि वाढणार आहे यांत शंका नाहीं. पण या साहित्याहूनही अधिक महत्वाचें कार्य बाबासाहेबापुढें दत्त म्हणून नेहमींच उभें असतें.

## स्वतंत्र्य भारताचे शिल्पकार

स्वातंत्र्यकालानंतर बाबासाहेब खास आग्रहावरून नेहरू मंत्रिमंडळांत गेले. या मंत्रिमंडळांत गेल्यानें भारतीय जनतेचा एक मोठा फायदा झाला.

आणि तो म्हणजे भारताची घटना या थोर पुरुषाकडून लिहिली गेली. भारताचा शिल्पकार म्हणून बाबासाहेबांची सर्वत्र ख्याति झाली. आयुष्य भर प्रतिगामी आणि विरोधी शक्तीशीं लढत देऊन विरोधकांचा त्यांनीं धुव्वा केला आणि स्वतंत्र भारताच्या प्रजासत्ताकाची मुहूर्तमेढ रोवली

भारताची घटना बनविण्यास बाबासाहेबांनीं खास श्रम घेतले. घटना सुपूर्द झाल्यावर त्यानीं सिद्धार्थ कॉलेजमधील विद्यार्थ्यांसमोर एका भाषणात या कष्टांची कल्पना करून दिली होती. जगांतील सर्व प्रमुख देशांच्या घटना त्यानीं वाचून काढल्या होत्या. देशाच्या घटनेनें व्यक्तीचें स्वातंत्र्य नियंत्रित केलें आहे. या स्वातंत्र्यावर कधीं संकट येईल हें सागतां येणार नाहीं म्हणून त्यानीं स्वातंत्र्याच्या रक्षणासाठीं प्रत्येकाने आपला शेवटचा रक्तबिंदूही सांडावयाला तयार असलें पाहिजे, असा आदेश दिला आहे. आपल्या देशाची आधींच जातीभेदानें दुर्दशा झाली आहे. आपण एका राष्ट्राचे घटक आहोंत, सारे हिंदी आहोंत, ही भावना आमच्यात निर्माण केली पाहिजे असें त्यांनीं निक्षून सांगितलें. ते म्हणतात, 'हजारों जमातीनीं छेदलेल्या जनतेचें राष्ट्र कसें बरें होणार ? सामाजिक आणि नैतिक दृष्ट्या आपण 'राष्ट्र' नाहीं आहोंत ह्याची आपल्याला लौकर जाणीव झाली पाहिजे. तसें घडलें तरच आपण सर्व घटक 'राष्ट्र' बनलों पाहिजे याची आपल्याला अधिक ओढ लागेल. अमेरिकेसारख्या देशालाही अशा परिस्थितींतून वाव काढावा लागला. आपल्यामध्यें ही 'राष्ट्र' भावना उत्पन्न व्हायला अधिक वेळ लागेल व अधिक त्रास होईल. अमेरिका व स्वित्झर्लंड या देशाच्या घटना त्यांना आदर्श वाटल्या. याच देशातून आदर्श लोकशाही आहे, असें त्यांचें ठाम मत आहे व म्हणूनच त्यांच्या घटनांच्या अभ्यासांतून भारताला योग्य अशी घटना त्यांनीं तयार केली.

घटना सर्वसंमत झाल्यावर त्यांनीं समारोपाचें भाषण केलें. हें भाषणास ऐतिहासिक महत्व प्राप्त झालें. लोकशाहीची व्याख्या त्यानीं भारताला समजावून दिली. घटना कितीही चांगली असली तरी त्याला राबवणारीं शासनकर्तीं माणसें उदार मनाचीं व नीतीची कदर करणारीं हवींत. तीं जर वाईट असतील, तर घटनाही तशीच ठरेल. पानी तेरा रंग कैसा।

जिससें मिळावें वैसा । अशी ही घटनेची निर्मल गंगा त्यांनीं भारतीय जनता जनार्दनाचे सेवेसाठीं उत्पन्न केली.

दुर्दैवानें आपला देश जाती–पोटजातींनी पोखरला आहे, आंतून छेदला आहे. सामाजिक जीवनाची कुंचबणा झाल्यामुळें त्या राष्ट्रविरोधी बनल्या आहेत व शिवाय परस्पर विरोधीहि बनल्या आहेत. द्वेष व मत्सर यांचें जाती माहेरघरच आहेत.

जुन्या जमान्यातल्या ऋषिमुनींनीं घातलेले निर्बंध आज आपण तोडूं पहात आहोंत. 'मनुस्मृति' आज कुचकामी आहे. ! भारतावरील ब्रिटिश राजवट संपुष्टांत आली, त्याचप्रमाणें हीं धार्मिक व सामाजिक बंधनेंहि तुटलीं गेलीं पाहिजेत.

भारतीय घटना बनवून बाबासाहेब भारताच्या [illegible] न्या पदवीस पात्र ठरले. त्याच्या घटना–पाडित्याची सर्वत्र स्तुति झाली.

परंतु तेवढ्यानें त्याचें समाधान झालें नाहीं. ज्या हिंदुशास्त्रांनीं अन्यायाची कास धरून माणुसकीची अवहेलना केली तीं हिंदु शास्त्रें समूळ बदलल्याशिवाय समता–स्वातंत्र्याची घडी नीट बसणार नाहीं असें त्याचे मन त्याना सांगत होतें. मनुस्मृतीला त्यानीं भडाग्नि दिला यांतच त्याचा कार्यभाग संपला नव्हता. मनुस्मृतीची जागा दुसऱ्या आधुनिक स्मृतीनें भरून काढणें जरूर होतें. त्यासाठीं त्यानीं **हिंदु कोड बिल** रचण्यास घेतलें. केंद्रसरकारकडून संमत करून घेण्यासाठीं कायदेमंत्री असताना पराकाष्ठेचा प्रयत्न केला. परंतु बाबासाहेबाविषयीं हिंदु सनातन्यांच्या मनात अढी धरून बसलेला पूर्वग्रह अजूनही साफ झाला नव्हता; हिंदु कोडबीलची रचना बाबासाहेबासारख्या शूद्रानें–महारानें करावी ही जाणीव त्याना असह्य झाली. या बिलाच्या चागुलपणाकडे न पाहता पुन' बाबासाहेबांना प्रचंड विरोध त्यांनीं सुरू केला. सनातन्याचे लोकसभेतील प्रतिनिधी त्याच्याविरुद्ध जळफळाट करायला लागले; अर्थात हिंदूच्या कॉंग्रेसला अशा क्रांतीकारक बिलाला मान्यता देणें शक्य नव्हतें. आधुनिक 'मनु' म्हणून बाबासाहेबांना मिळणारा हा मान त्यांनीं हिरावून घेतला. आणि या बिलाची आपल्या विरोधानें छकलें केली.

त्यामुळें बाबासाहेबाचें हृदय व्याकूळ झालें. आपलें एक महान् कार्य या दुष्ट लोकांनीं उधळून लावल्यानें ते निराश झाले. आणि पुनः एकदां कॉंग्रेस व हिंदू यावरील त्याचा विश्वास पार उडून गेला. २७ सप्टेंबर १९५१ रोजीं त्यानीं कायदेमंत्री पदाचा राजीनामा दिला.

## बहुजन हिताय बहुजन सुखाय

आपला सामाजिक राजकीय उद्धार हिंदूच्या मार्गानें होणार नाहीं हें त्याना पटलें. धर्माला जीवनात अधिष्ठान पाहिजे हें त्यानीं नेहमींच प्रतिपादिलें आहे. म्हणून सातकोटी जनतेला--उपेक्षिताना त्यानीं नवा मार्ग शोधून काढला आणि **बहुजनहिताय, बहुजनसुखाय** असा बुद्धाचा धर्मच आपलें कल्याण करील असें त्यानीं जाहिरपणें प्रकट केलें. बाबासाहेबांचा हा नवा आदेश दलितसमाजानें मोठ्या उत्साहानें स्विकारला व त्याच्या पूर्तीसाठीं त्यानीं प्रयत्न सुरू केले. भगवान बुद्धाची शिकवण दलित समाज मोठ्या भक्तीनें समजून घेऊं लागला आहे.

बुद्धधर्मक्षेत्रांची प्रत्यक्ष तीर्थयात्रा करावी म्हणून ते पुष्कळ बुद्धक्षेत्रांना भेट देऊन आले. सिलोन व ब्रह्मदेश येथील बुद्धपंथीय धर्मगुरूंच्या निमंत्रणावरून ते या देशांना भेट देऊन आलेच. ब्रह्मदेशातील आपले अनुभव सांगताना बुद्ध धर्माचें महात्म्य त्यांनीं साऱ्याशा एका दाखल्यानें दिलें आहे. रंगूनला ते गेले होते. तेथील बुद्धविहार जगातील मोठा ! तेथून ते मंडाल्याला गेले. तेथील बुद्धविहारालाहि भेट दिली. या विहाराच्या आसपास अगदीं प्रसन्न वातावरण असल्याचें त्यानीं सांगितलें. बुद्धाची शिकवण तेथील लोकांच्या रक्तमासांत भिनली आहे. बुद्धानें चोरी करूं नये म्हणून सागितलें. त्या देशांत चोरीच होत नाहीं असें त्यांना दिसलें. कारण रस्त्याच्या दुतर्फा असलेल्या दुकानांतुन त्याचा माल रात्रीं, अवेळीं पहाऱ्याशिवाय पडून असतो. पण कुणीहि तो उचलून नेत नाहीं. तेथें चोरी नांवालाहि माहीत नाहीं. थोडक्यांत तेथील लोकानीं बुद्धाची शिकवण पचविली आहे व ती पाचक आहे म्हणूनच ती त्याना पचली. बाबासाहेबांना बौद्धधर्म दलितांचा उद्धार करील असे जें खात्री-

२२५८ ... १२५८ ... २२/१/५८



## हिंदू म्हणून जन्मलों, पण हिंदू म्हणून मरणार नाहीं !

नेहरू मंत्रिमंडळातून बाहेर पडल्यानंतरचें त्याचें उर्वरीत दैनंदिन जीवन भगवान् बुद्धाच्या शिकवणींत गुंतून गेलें होतें. बुद्धापरतें त्याना काहींही दिसत नसे. तुम्ही कोणताही विषय काढा, पण तो बुद्धधर्मा-विषयीं किंवा बुद्धाविषयीं नसेल तर त्याचें मन रमत नसे. मोठ्या भक्तिभावानें ते बुद्धमूर्तींची रोज पूजा करीत असत. बुद्ध किंवा त्याच्या महान् संदेशासंबंधीं बोलताना ते इतके तन्मय होत कीं, आपली तहानभूक विसरून जात. खरें म्हणजे ते सर्वथैव बुद्धमय झाले होते. बुद्धाची 'हाक' त्याना सारखी ऐकूं येत असावी. आणि त्यामुळेंच प्रकृतीस्वास्थ्य नसताही आपली बुद्धधर्माची दीक्षा त्वरेनें उरकून घ्यावी असा त्यानीं निर्णय घेतला.

बाबासाहेबांच्या दीक्षेचा हा विधी रविवार १४ ऑक्टोबर १९५६ रोजीं नागपूर येथें ब्रह्मदेशाचे महास्थविर चंद्रमणि याच्या पवित्र हस्तें पार पडला. नागपूर शहरातील हा सोहळा नेत्र दीपवून टाकणारा होता. अखिल अस्पृश्य जनतेंत एक प्रकारचें नवचैतन्य निर्माण झालें होतें. बाबासाहेबांच्या 'दीक्षा' दिनीं आपलीही धर्मांतर दीक्षा पार पडावी या तीव्रतर इच्छेनें अखिल भारतांतील आणि महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यांतील दलित जनता नागपूरला येऊन ठेपली. सामुदायिक धर्मांतराचा हा अपूर्व पण भयचकित करणारा सोहळा पाहून धर्मांतराचे टीकाकार जिथल्या तिथें थिजून गेले. त्याच्या दीक्षेचा यथासांग विधी आटोपला आणि इतराची दीक्षा बाबासाहेबांच्या पुण्यहस्तें झाली. विशेष नमूद करण्यासारखी गोष्ट म्हणजे या प्रसंगीं बाबासाहेबांसमवेत हिंदुधर्माचा त्याग करून बौद्धधर्म स्विकारणारी अस्पृश्येतर मंडळीही होती. अखिल भारतानें बौद्ध-

पूर्वक वाटतें तें याचमुळें. व म्हणूनच बुद्धाच्या मार्गानें ते भारतीय दलितांचा सामाजिकच नव्हे तर आध्यात्मिक उद्धार करावयास सज्ज झाले आहेत.

सात कोटी उपेक्षित जीवांचा उद्धार करण्यासाठीं बाबासाहेबांचा जन्म झाला हें कांहीं आतां ओरडून सांगण्याची जरुरी नाहीं. त्यांनीं आपल्या कृतीनें, अतुल त्यागानें, विद्येच्या तपचर्येनें ही गोष्ट सिद्ध केली आहे.

त्यांनीं विद्येची तपश्चर्या केली त्याचप्रमाणें विद्यादानही केलें. आतांशा दोन गोष्टी महत्वाच्या वाटतात; एक बुद्धाचा मार्ग आपल्या अनुयायांना शिकविणें आणि स्वतःही त्यामार्गानें जाणें व दुसरी गोष्ट म्हणजे शिक्षण प्रचार करणें. त्यासाठीं मुंबईतील सिद्धार्थ कॉलेज व औरंगाबादचें मिलिंद विद्यालय हीं ज्ञानपीठें त्यांनीं स्थापन केलीं. त्यांच्या सन्निध्यांत आलेल्यांना ते आतां नेहमीं हेंच सांगतात "माझें कार्य मी केलें आहे. मी समाधानी आहे. मला आतां बुद्धाच्या मार्गानें जावयाचें आहे. दुसरे कुणी येवोत वा न येवोत; मी माझा विश्वास भगवान बुद्धावर टाकला आहे. माझें असें आतां कांहीं राहिलें नाहीं. आहे हें भगवान बुद्धचरणीं समर्पित आहे."

डॉ. बाबासाहेबांची ही आध्यात्मिक तंद्री ते पूर्ण बुद्धमय झाल्याचेंच द्योतक आहे. दलिताच्या उद्धाराचें अवतारकार्य करून हा मानवश्रेष्ठ आतां 'प्रबुद्ध' झाला हेंच खरें !

## हिंदू म्हणून जन्मलों, पण हिंदू म्हणून मरणार नाहीं !

नेहरू मंत्रिमंडळातून बाहेर पडल्यानंतरचें त्यांचें उर्वरीत दैनंदिन जीवन भगवान् बुद्धाच्या शिकवणींत गुंतून गेलें होतें. बुद्धापरतें त्याना काहींही दिसत नसे. तुम्ही कोणताही विषय काढा, पण तो बुद्धधर्माविषयीं किंवा बुद्धाविषयीं नसेल तर त्याचें मन रमत नसे. मोठ्या भक्तिभावानें ते बुद्धमूर्तींची रोज पूजा करीत असत. बुद्ध किंवा त्याच्या महान् संदेशासंबंधीं बोलताना ते इतके तन्मय होत कीं, आपली तहानभूक विसरून जात. खरें म्हणजे ते सर्वथैव बुद्धमय झाले होते. बुद्धाची ' हांक ' त्याना सारखी ऐकूं येत असावी. आणि त्यामुळेंच प्रकृतीस्वास्थ्य नसतांही आपली बुद्धधर्माची दीक्षा त्वरेनें उरकून घ्यावी असा त्यानीं निर्णय घेतला.

बाबासाहेबांच्या दीक्षेचा हा विधी रविवार १४ ऑक्टोबर १९५६ रोजीं नागपूर येथें ब्रह्मदेशाचे महास्थविर चंद्रमणि यांच्या पवित्र हस्तें पार पडला. नागपूर शहरांतील हा सोहळा नेत्र दीपवून टाकणारा होता. अखिल अस्पृश्य जनतेंत एक प्रकारचें नवचैतन्य निर्माण झालें होतें. बाबासाहेबाच्या ' दीक्षा ' दिनीं आपलीही धर्मांतर दीक्षा पार पडावी या तीव्रतर इच्छेनें अखिल भारतांतील आणि महाराष्ट्राच्या कोनाकोपऱ्यांतील दलित जनता नागपूरला येऊन ठेपली. सामुदायिक धर्मांतराचा हा अपूर्व पण भयचकित करणारा सोहळा पाहून धर्मांतराचे टीकाकार जिथल्या तिथें थिजून गेले. त्याच्या दीक्षेचा ययासांग विधी आटोपला आणि इतराची दीक्षा बाबासाहेबाच्या पुण्यहस्तें झाली. विशेष नमूद करण्यासारखी गोष्ट म्हणजे या प्रसंगीं बाबासाहेबांसमवेत हिंदुधर्माचा त्याग करून बौद्धधर्म स्विकारणारी अस्पृश्येतर मंडळीही होती. अखिल भारतानें बौद्ध-

धर्म स्वीकारावा अशी त्यांची प्रबळ मनीषा होती. हिंदुधर्मातील अन्याया-विरुद्ध उचललेल्या शस्त्राचा हा प्रभाव होता. बाबासाहेबांच्या कार्याचा हा प्रचंड विजय होता. 'हिंदू म्हणून जन्मलों, तरीं हिंदू म्हणून मरणार नाहीं.' ही वीस वर्षापूर्वीची आपली प्रतिज्ञा त्यांनीं खरी करून दाखविली.

नागपूरचा दीक्षा सोहळा अपूर्व म्हणून हिंदुस्थानभर गाजला. बाबासाहेबामागें केवढें जनताबळ आहे, त्यांची संघटनाशक्ति केवढी प्रभावी आहे याचा पुनः एकदा हिंदु जनतेला प्रत्यय आला. परंतु अत्यंत खेदाची गोष्ट म्हणजे हिंदुधर्माच्या मुळाशीं घातलेल्या या प्रखर प्रहाराचें सामुदायिक धर्मांतराचें हिंदू म्हणविणाऱ्यांना—हिंदुधर्माचा अभिमान मिरविणाऱ्याना किंचितही दुःख झालें नाहीं. त्यांची ही धर्माबद्दलची अनास्था समजावी, अज्ञान समजावें कीं, नुसतीच कींव करावी ?

## नेपाळला प्रयाण

डॉ. बाबासाहेब या सोहळ्यानंतर नेपाळ सरकारच्या आणि बुद्धजन समितीच्या आमंत्रणावरून ते पंचविसाव्या बुद्धशताद्बीच्या कार्यक्रमासाठीं गेले. बाबासाहेबांची प्रकृती म्हणण्यासारखी चागली नव्हती खरी, पण त्यांची बुद्धावरील श्रद्धा मोठी होती. त्यामुळेंच ते इतक्या दूरच्या प्रवासास जाऊन आले. नागपूरच्या दीक्षेनें त्याचें मन पुलकित झालें होतें. भगवान बुद्धाच्या चरणीं आसरा मिळाल्याचें विलक्षण समाधान त्यांना लाभलें होतें. त्यांना आपल्या जीवनात कृतकृत्य झाल्याचा परमानंद लाभला होता.

बाबासाहेबांच्याच पुण्यप्रद हस्तें आपलाही दीक्षाविधी होऊन आपणही भगवान बुद्धचरणीं पात्रन व्हावें अशी सर्वत्र इच्छा प्रगट करण्यांत आली.

त्याप्रमाणें मुंबईच्या विराट नगरींत बौद्धधर्म दीक्षेचा सोहळा साजरा करावयाचा असें बाबासाहेबांनीं निश्चित केलें. डिसेंबर १९५६ मध्येंच हा कार्यक्रम व्हावयाचा होता. सारी दलित जनता या सोहळ्याच्या दिवसा-कडे डोळ्यांत जीव आणून प्रतीक्षा करीत होती.

## महान् शक्तीचें महापरिनिर्वाण !

दलितजनतेच्या लढाऊ, क्रांतिकारक इतिहासाचा शेवट करणारी भीषण रात्र अगदीं जवळ येऊन ठेपली होती. खुद्द बाबासाहेबांना, त्यांच्या आप्तांना, सहकाऱ्यांना किंवा कोट्यावधि अनुयायांना चोर-पावलांनीं चालणाऱ्या या काळाची किंचित्‌ही चाहूल लागली नाहीं. अखेर बुधवार दिनांक ५ डिसेंबर १९५६ ची रात्र दलित जनतेची काळरात्र ठरली !

आपल्या बुद्धधर्मावरील पवित्र धर्मग्रंथाची प्रस्तावना लिहिण्यासाठीं जागून उशीरां झोंपलेलें दलितांचें दैवत निद्रावस्थेंतच बुद्धपदीं विलीन होऊन गेलें. सर्वांचे ' बाबा ' पुनः जागे झाले नाहात.

केवढी भयंकर बातमी !

सारा दलित समाज दुःखानें व्याकुळ झाला. कित्येकांना भोंवळ आली. कोणी वेड्यासारखे भिंतीवर डोकें आपटून जीव देऊं लागले. बाबासाहेबांवरील आपलें अमर्याद प्रेम कुठल्या शब्दांनीं व्यक्त करावें हें कुणासच उमजेना. मुग्धमूढ होऊन आता पुढें काय होणार याचाच जो तो विचार करीत होता. हुस्काऱ्यांनीं आसमंत भरलें होतें. अश्रूंचे ओघळ लागले होते !

पुढें काय ?

बाबासाहेबांचें शव दुसऱ्या दिवशीं खास विमानानें दिल्लीहून मुंबईला आणलें. रात्रीं २ वाजून १० मिनिटांनीं शव घेऊन येणारें विमान सांताक्रूझ तळावर आलें. मुंबईच्या जनतेनें ती रात्र जागून काढली. आपल्या पुढाऱ्यावरील केवढें हें अगाध प्रेम ! दुःखानें विव्हळणारी लक्षावधि जनता त्यांच्या अंत्यदर्शनासाठीं शिस्तबद्ध रीघ लावून राहिली होती. सारी मुंबई दलितांनीं भरून गेली होती.

## केवळ बाबासाहेबांच्या अंत्यदर्शनासाठीं !

संध्याकाळीं सुमारें ७ वाजतां बौद्ध धर्म विधिप्रमाणें बाबासाहेबांच्या शवाला चंदनाच्या चितेवर अग्नि दिला. आदरांजली वाहण्यासाठीं स्मशानभूमीवर झालेल्या आचार्य अत्रे यांच्या भाषणानें लाखों लोकांचा दुःखावेग बेफाम वाढला आणि सर्व जनता हुंदके देऊन रडूं लागली. कांहीं पोलीस व अधिकारीही दुःखाचा हा उसळी मारणारा हुंदका आवरूं शकले नाहींत. अत्रे म्हणाले, "या महान् नेत्याच्या मृत्युनें मृत्यूचीच कींव करावीशी वाटते. मरणानेंच आज आपलें हंसू करून घेतलें आहे. मृत्युला काय दुसरी माणसें आढळली नाहींत? मग त्यानें इतिहास निर्माण करणाऱ्या या नरपुंगवावर, एका महान् जीवनाच्या या ग्रंथावर इतिहासाच्या एका पर्वावरच कां झडप घातली? महापुरुषाचें जीवन पाहूं नये असें म्हणतात. पण त्यांचें मरण पहायचें भाग्य आपल्याला लाभलें. आकाशांतील देवानांही हेवा वाटावा असें भाग्य त्यांना लाभलें आहे. परंतु असा युगपुरुष शतका शतकांत तरी होणार नाहीं. झंझावाताला मार्गे सारणारा महासागराच्या लाटांसारखा अवखळ स्वभाव त्यांचा होता. जन्मभर त्यांनी बंड केलें. आंबेडकर म्हणजे बंड. असा बंडखोर, शूरवीर, बहादुर पुरुष आज मृत्यूच्या मांडीवर कायमची चिरनिद्रा घेत आहे. त्याचें वर्णन करण्यास शब्द नाहींत. याच वेळीं लक्षावधी लोकांनीं शवासमक्ष बौद्धधर्म दीक्षा घेतली. हा दीक्षेचा कार्यक्रम भदन्त आनंद कौसल्यायन यांनीं मोठ्या गंभीरपणें उरकून घेतला. मुंबईच्या इतिहासांत हा दिवस बाबासाहेब स्मृति म्हणून अमर झाला.

दलित जनता कायमची पोरकी झाली. आतां कुणाच्या तोंडाकडे पाहावयाचें? दलित जनतेचा भविष्यकाळ कोण उजळविणार?

पण हताश होऊन कसें चालेल? बाबासाहेबांनीं मुळुमुळु रडण्यास शिकविलें नाहीं. त्यांनीं झगडण्यास शिकविलें. भगवान् बुद्धानी आपल्या

निर्वाणापूर्वी त्याचा परमशिष्य आनंद याळा जो संदेश दिला, तो संदेश सांगून मी हें चरित्रसार संपविलें तर अधिक उचित होईल.

## माझी शिकवणच तुमचा गुरु होऊं दे !

भगवान बुद्धांनीं परमशिष्य आनंद याला जवळ बोलाविलें. "आनंद, इकडे ये. आपण थोडा वेळ कुशिनारांतील सालवनांत जाऊं." आनंदानें होकार दिला. सालवनांत आल्यावर त्यांनीं उत्तर दिशेस आपलें अंथरूण पसरायला सांगितलें. "मी थकलों आहे आणि मला जरा पहुडलें पाहिजे." आनंदानें अंथरूण घातलें. भगवान बुद्ध त्यावर पहुडले. पाय तिढून स्थिर चित्तानें ते एकाग्र झाले. समाधिस्थ झाले.

यावेळीं आनंद विषण्णमनानें विहारांत गेला. "मी अजून छात्रच राहिलों आहे. मला पूर्णता आली नाहीं. आणि माझे स्नेहल गुरु निर्वाण पंथास लागले आहेत." या विचारानें त्याचें मन विव्हळूं लागलें. डोकें सुन्न झालें.

याच वेळीं भगवान् बुद्धानीं त्याला हांक मारिली. "आनंद, कुठें आहे तो ? त्याला जवळ बोलवा." आनंद जवळ आला. त्यांच्या पायाशीं गुडघे टेकून विनम्र होऊन बसला.

भगवान बुद्ध बोलले, "आवर, तुझें दुःख आवर, चित्त ढळूं देऊं नकोस, रडूं नकोस. जगांतील सर्व कांहीं नश्वर आहे. आपल्याला प्रिय असलेल्या सर्व वस्तुमात्रापासून आपल्याला अलिप्त व्हावें लागणार, हा नियतीचा नियम आहे. जें निर्माण झालें तें नष्ट होणारच. विश्वाची रचनाच तशी आहे. तो विनाश टाळता येत नाहीं. आचारविचारानें, प्रेमानें आणि सुहृदयतेनें तूं मला जवळचा आहेस. तूं चांगली कामगिरी बजावली आहेस. तूं मनापासून प्रयत्न कर. जग नाशवंत आहे या भावनेनें गोंधळूं नकोस. तुलाही या भावनांवर विजय मिळवितां येईल."

भगवान् बुद्ध पुढें म्हणाले, "तुम्हांपैकीं कांहींच्या मनांत येईल कीं, आमच्या महागुरुची वाणी संपली. आतां आम्हांला कोण शिकविणार ?

पण तुम्ही असें मानूं नका; माझ्यावर विश्वास ठेवा. मी जो सत्याचा मार्ग दाखविला आहे, तो पुढें चालवा. तो धर्म, तें सत्य व तो आचार तुमचा सर्वश्रेष्ठ गुरु होऊं दे!"

पुढें ते म्हणाले, "सर्व प्राणिमात्रांचा विनाश ठरलेलाच आहे. तो त्यांचा गुणधर्म आहे. तेव्हां आपल्या उद्धाराचा मार्ग आणि कार्यासक्ति यापासून तसूभरही ढळूं नका."

तथागताचे हे शेवटचे उद्गार होते!

बाबासाहेबांच्या महापरिनिर्वाणानंतर दलितबांधवांना याहून निराळें कांहींच सांगण्याची जरुरी नाहीं. बाबासाहेब आपलें अवतारकार्य संपवून गेले. पण दलितांच्या उद्धारासाठी आम्ही कार्यरत राहण्याचा संदेश त्यांनीं दिला आहे. तो सदैव हृदयांत बाळगणें हीच त्यांना खरी श्रद्धांजली!

RLLBK-0008948

मराठी ग्रंथ सं[illegible]ग्रह, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम 21258. दि. [illegible]
क्रमांक [illegible] नों: दि: [illegible]

डॉ. आंबेडकरांचें जीवनसार लिहिण्यास मला त्यांचें हीरकमहोत्सव प्रसंगींचें भाषण, श्री चांगदेव भगवानराव खैरमोडे यांनीं लिहिलेलें डॉ. आंबेडकरांचें चरित्र (मराठी) आणि श्री. धनंजयराव कीर यांनीं लिहिलेलें डॉ. आंबेडकरांचें अवतारकार्य (Dr. Ambedkar, His Life & Mission) हें इंग्रजी चरित्र यांचा बहुमोल उपयोग झाला हें मी कृतज्ञतापूर्वक नमूद करीत आहे.

—लेखक



भगवान् बुद्धाचा धर्म हाच माझा मार्ग !

# रंगभूमीवर गाजत असलेलीं लोकप्रिय नाटकें

| | | | | |
|---|---|---|---|---|
| कवडीचुंबक | | [प्रि. प्र के अत्रे] | रु. २ | |
| ब्रमाचा भोपळा सचित्र नाटक | | ,, ,, | २ | |
| पाणिग्रहण | | ,, ,, | २ | |
| जग काय म्हणेल ! | | ,, ,, | २ | |
| साष्टांग नमस्कार | ,, | ,, ,, | २ | ४ |
| वंदे भारतम् | ,, | ,, ,, | २ | ० |
| मी उभा आहें | ,, | ,, ,, | २ | ० |
| घराचा कावळा | ,, | ,, ,, | २ | ६ |
| वसंतसेना | ,, | ,, ,, | १ | ० |
| गुरुदक्षिणा | ,, | ,, ,, | १ | ० |
| वीरवचन | ,, | ,, ,, | १ | ८ |
| तिलाच तें कळतं | | [भा. वि. वरेरकर] | २ | ८ |
| नवा पाईक | | [कै. डॉ. ग. य. चिटणीस] | १ | ५ |
| संत तुकाराम | | [कै. बाबाजीराव राणे] | १ | ८ |
| राजा हरिश्चंद्र | | ,, | १ | ८ |
| संत पुंडलीक | | ,, | १ | |
| हिरा हरपला सचित्र नाटक | | [शां. गो. गुर्जे] | १ | |
| दख्खनचा मोहरा | | ,, | १ | |
| पेशवाईनंतर | ,, | ,, | १ | |
| दख्खनचा दिवा | ,, | [श्री टिपणीस] | १ | |
| यज्ञमंडप | ,, | [कै. श्री कृ ओक] | १ | |
| बनावट बायको | | [कै. मा कृ शिंदे] | १ | |
| गृहलक्ष्मी | तिसरी आवृत्ति | [ ,, ] | १ | |
| तोफेच्या तोंडीं | | [मा. आ. कामत] | १ | |
| मधाचें मोहोळ | | [भा. वि. नाडकर्णी] | १ | |
| स्वराज्य-तोरण | | [द. का. भिंगार्डे] | १ | |

आमच्या इतर पुस्तकाचें माहितीपत्रक मागवा

रामकृष्ण प्रकाशन मंडळ, त्रिभुवन रोड, मुंबई ४